
३ एप्रिल ६८ । चाळीस पैसे

# माणूस

## योजन जेव्हा 'खालून वर' जाते



बरखेड योजना उद्घाटन प्रसंगी महाराष्ट्राचे पाटबंधारे मंत्री ना. शंकरराव चव्हाण

# उंबरखेड....

नियोजन तळापासून वर गेले पाहिजे, वरून खाली ते लादले जाता कामा नये, गेल्या वीस वर्षांतील आमचे नियोजन फसले याचे कारण ते 'वरून खाली आले'. हे विचार आता ऐकून ऐकून व वाचूनवाचूनही कंटाळा आला आहे.

पण खालून वर नियोजन म्हणजे काय, त्याची सुरुवात व अंमलबजावणी कशी करायची, त्यात जनतेचा, सामाजिक कार्यकर्त्यांचा व शासनाचा नेमका भाग कुठला, चालू दिल्लीछाप नियोजनापेक्षा त्यातील वेगळेपण व वैशिष्ट्य कशात आहे या प्रश्नांना नेमकी रोकडी उत्तरे कोणीच देत नाही.

ही उत्तरे ज्यांना शोधायची आहेत अशांसाठी नासिकच्या 'गावो शंकर' या साप्ताहिकाच्या प्रतिनिधीने, उंबरखेड योजनेचे प्रवर्तक श्री. दौलतराव घुमरे वकील यांची घेतलेली ही एक मुलाखत......

**प्रश्न :** ही योजना अमलांत आणण्यापूर्वी आपल्या गावची आर्थिक परिस्थिती कशी होती ?

**घुमरे :** महाराष्ट्रातील इतर कोणत्याही खेड्यात असते तशी. लोक दारिद्र्याने गांजलेले, क्षुद्र मतभेदासाठी कोर्टदरबारात पैशाचे पाणी करणारे, दोन महिने शेतीत काम करून दहा महिने चावडीत नाहीतर पिंपळाच्या पारावर चकाट्या मारणारे, न समजणाऱ्या आणि प्रत्यक्षात निरुपयोगी असलेल्या राजकारणासाठी तंटे-बखेडे, हाणामाऱ्या करणारे अधिक लोक आमच्या गावात होते.

**प्रश्न :** असे लोक असल्याने गावाची गुजराण कशी होत असे ?

**घुमरे :** दोन वेळा पोटभर जेवणारे, चांगली वस्त्रे आणि चांगला निवारा असलेले लोक आमच्या गावात अगदीच कमी !

**प्रश्न :** आपण नासिकला राहता, मग गावाची सुधारणा झाली पाहिजे ही कल्पना तुम्हांला कशी स्फुरली ?

**घुमरे :** माझा जन्म शेतकरी कुटुंबात झाला आहे. त्यामुळे आमचा एक स्वभावच असा बनला आहे की, आम्ही केवढ्याही मोठ्या शहरात गेलो तरी आपल्या गावाबद्दलची आत्मीयता कधी कमी होत नाही. त्यातूनच काहीतरी केलें पाहिजे असे नेहमी वाटायचे व तसे करण्याची कल्पना मला नारायणराव बोरस्ते यांनी दिली.

**प्रश्न :** हे बोरस्ते कोण ?

**घुमरे :** नारायणराव बोरस्ते हे आमच्याच गावचे पण इंजिनीयरिंग खात्यात ते नोकरी करतात. ते एकदा नासिकला आले आणि त्यांनी सांगितले की, उंबरखेड गावात कादवा नदीजवळ जर आपण तलाववजा प्रचंड विहीर खोदली तर गावाचे दैन्य खात्रीने दूर होईल. त्यांच्या सूचनेवर मी विचार केला. त्यानंतर माझे एक इंजिनीयर मित्र श्री. डी. एस. नाईक यांना मी ती योजना सांगितली. तांत्रिक पाहणी करून त्यांनी योजना योग्य अस-

[ कव्हर पान ३ वर ]

समग्र साप्ताहिक
माणूस

वर्ष : सातवे : अंक : सेहेचाळिसावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

---

स. न. एप्रिल, ४

'अन्नस्वतंत्रता संचलन' या आपल्या कार्यक्रमाबद्दल हार्दिक अभिनंदन. यात सहभागी व्हावे अशी फार इच्छा होती. पण अनेक अडचणींमुळे जमले नाही; अशा असंख्य लोकांपैकी मी एक.

स्वतंत्र राष्ट्र म्हणून खरोखरच जगायचं असेल तर स्वाभिमान आणि जिद्द या दोन गोष्टी जनमनात सतत हव्यात. मानानं जगायचं असेल तर स्वावलंबन हा मंत्र हवा. आपल्या जनतेत ही भावना जागृत करण्याचे तुमचे प्रयत्न त्यामुळेच स्तुत्य आणि अभिनंदनीय. 'अन्नस्वतंत्रता संचलन' ही तुमच्या कार्याची नुसती नांदी ठरो. सर्वार्थाने संपूर्ण स्वतंत्रता हेच आपणा सर्वांचे ब्रीद हवे.

ॲड. मधुकर परांजपे,
पुणे

---

मूल्य चाळीस पैसे
४१९ नारायण,
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.



**या सर्वांनी झटून नासिकचा दोन दिवसांचा कार्यक्रम कल्पनेबाहेर यशस्वी केला.**

श्री. बापूसाहेब उपाध्ये, डॉ. वि. म. गोगटे, तोष्णीवाल, क्षत्रिय, नाईक, टेंवे, बरकतभाई, करडिले, भाटे...कार्यकर्त्यांचा हा एक चांगला संचच मनापासून पटलेल्या कुठल्याही कार्याला उचलून धरायला येथे नेहमी उत्सुक असतो.

या कार्यकर्त्यांच्या उत्साहावर थोडे विरजणही पडले. पुण्या-मुंबई-हून बरीच साहित्यिक-पत्रकार मंडळी नासिकला येणार अशा वार्ता त्यांना मिळाल्या होत्या.

या पाहुण्यांच्या स्वागतासाठी कितीतरी कमानी नासिक शहरात स्वयंस्फूर्तीने उभारण्यात आल्या होत्या !

सत्काराचे अनेक कार्यक्रम योजले होते !

उतरण्यासाठी एस्. टी. डेपोसमोरील क्षत्रियांचा प्रशस्त बंगला तयार ठेवला होता. पण कोणीच आले नाही. कोणी सकारण, कोणी अकारण.

या कार्यकर्त्यांचा मात्र विरस झाला. त्यांनी तो जाणवू दिला नाही, हे त्यांचे मोठेपण. ठरल्याप्रमाणे सर्व कार्यक्रम अगदी व्यवस्थित डामडौलात व उत्साहात पार पडले.


# प्रतिपच्चंद्ररेखेव

८

१५ तारखेला संचलनाला निरोप देण्यासाठी जमलेल्या या मेळाव्यात

**दौलतराव घुमरे वकील**

येऊ शकले नव्हते, पण नासिकच्या यशात यांचाही वाटा कमी नव्हता.



# दौलतराव....

निफाड तालुक्यातील उंबरखेडची सर्व योजना व त्यामागची प्रेरणा म्हणजे हीच व्यक्ती.

कम्युनिस्ट पक्षाचा जुना झुंझार कार्यकर्ता. पक्षातील झब्बुशाहीला विटून आता नाशकात वकील म्हणून स्थिरावला आहे.

पण जुने संस्कार स्वस्थ बसू देत नाहीत. काहीतरी नवीन मार्ग हुडकण्याची सारखी धडपड सुरू आहे.


भिन्न राजकीय विचारांच्या, पण समाजहिताची कळकळ असणाऱ्या चार मंडळींना एकत्रित करून उंबरखेडचे दारिद्रय हटवण्याच्या भगीरथ उद्योगात सध्या हा गर्क आहे.

आदल्या दिवशीच्या नाशकातल्या जाहीर सभेत याने चुटकीसरसे सांगून टाकले– ' अन्नप्रश्न फार मामुली आहे. आपली तूट फार थोडी आहे. प्रश्न सदोष वाटपाचा आहे. चुकीच्या नियोजनाचा आहे. हे इतक्या दिवस का कोणाच्या लक्षात आले नाही याचेच आम्हांला आश्चर्य वाटते. अन्नस्वतंत्रता संचलनाने या प्रश्नाला धाडसाने तोंड फोडले म्हणून आम्ही सर्वजण या संचलनाकडे आकर्षित झालो. '

या सर्वांचा निरोप घेणे अवघड काम होते. जुने ऋणानुबंध असावेत अशी सर्वांची आपुलकी होती.

या आपुलकीपोटीच यातील बहुतेकजण संचलनासोबत मैल–दोन मैल पुढे चालतही निघाले.

मध्येच केव्हातरी संचलनासोबत पहिल्या दिवसापासून असलेले छायाचित्रकार वसंत मोरे यांनी हा 'पाठमोरा' क्षण पकडला.
मोरे या क्षणाच्या पाळतीवर होतेच.
कारण येथून संचलनाचे व्यवस्थापक
नागपूरला परतणार होते.



श्री. राजाभाऊ कुलकर्णी

त्यांनी जाऊ नये म्हणून मोकाशी–मोरे या जोडीने त्यांना अनेक आमिषे दाखविली, अनेक अडीअडचणी सांगून त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला.

मोरे म्हणत, 'राजाभाऊ, तुम्ही जाऊ नका. मुंबईला पोचल्यावर मी तुम्हांला तिकीट काढून व्यवस्थित गाडीत बसवून देईन. इतके दिवस राहिलात, थोडक्यासाठी यात्रेचे पुण्य कशाला वाया घालवता आहात !'

मोकाशी सांगत, 'नुकताच मी पुण्याला जाऊन आलो. पुस्तकाचे सर्व दुकानदार धंदा नाही म्हणून हात जोडून स्वस्थ बसले आहेत. तुम्ही नागपुरला नाही गेलात तरी काही बिघडणार नाही. आता रस्ता चांगला आहे. चांदणं आहे. रात्रीच्या चालीची गंमत बघा आणि वाटल्यास नंतर जा.'

श्री. ग. मा. या थट्टेचा समारोप करीत–'राजाभाऊंना जाणं अवश्य आहे. तुमचं सगळ्यांचं ठीक आहे. घरची काळजी मिटवून आला आहात. फक्त त्यांनी केव्हा जायचं हे त्यांचं त्यांनाच ठरवू द्या. त्यांना इकडचीही परिस्थिती माहीत आहे, तिकडचीही. आपण त्यांना मोकळे करू. यापूर्वीच खरे म्हणजे केले आहे. तेच थांबले हा त्यांचा मोठेपणा.'

थट्टा सोडा. १५ जानेवारीला आपल्या धंद्यापाण्याची काहीतरी तात्पुरती सोय लावून दोन–तीन आठवड्यांसाठी म्हणून राजाभाऊ संचलनाच्या पूर्वतयारीसाठी औरंगाबादला दाखल झाले! नेवासा आटोपून जावे, श्रीरामपूरला निरोप घ्यावा, संगमनेर उरकून सुटावे असा नागपूरला निघण्याचा दिवस सारखा पुढे ढकलला जात होता. कारण राजाभाऊ नसल्यावर संचलनाचा सर्व पुढचा मागचा पत्रव्यवहार कोण करणार, नवीन गावात जाऊन सर्व थरांतील, सर्व गटांतील, सर्व पक्षोपक्षांतील मंडळींना भेटून कार्यक्रमाची जमवाजमव कोण करणार, अशी सर्वांनाच काळजी होती. दोन महिने या सर्व गोष्टी राजाभाऊ कौशल्याने, अगदी मनापासून करीत आले होते. त्यांचे निःस्वार्थ कष्ट हा संचलनाचा फार मोठा आधार होता. हा आधार आजपासून सुटणार याचे सर्वांनाच वाईट वाटत होते.

पैठणला सोनखत गोळा करण्याच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. खताची गाडी ढकलताना राजाभाऊंच्या तोंडून सावरकरांच्या कवितेचा चरण सहज बाहेर पडला होता–

**'की घेतले व्रत न हे आम्ही अंधतेने.'**



–दामोदरदासजी मुंदडा यांचे सातपुडा विभागातील विनोबाप्रेरित आदिवासी सेवाकार्य ऐकून व त्यांना प्रत्यक्ष पाहून हा उद्गारला होता, ' केवढी मोठाली माणसे ही! बाहेर पडलो म्हणून भेटू शकलो. कितीतरी गैरसमज अशा भेटीगाठीतून सहज दूर होतात. '

–मराठवाड्यातील कम्युनिस्ट कार्यकर्ते श्री. चंद्रगुप्त चौधरी यांच्या भाषणातील कट्टर राष्ट्रवादी भूमिका एकून हा मनापासून सुखावला होता.

–शेवगावला दीनदयाळ उपाध्याय यांच्या मृत्यूची बातमी समजताच याला रडू अगदी अनावर झाले होते.

दिवसभर तो उदास होता.

राजकीय कटातून हा खून झाला आहे हे तो पहिल्या दिवसापासून सांगत होता.

–संगमनेरनंतरचा मुक्काम चिकणीला होता. डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे, अनंतराव कुलकर्णी, वि. स. वाळिंबे, श्रीकांत सवनीस ही मंडळी बरोबर होती. त्यांची गाडी बंद पडल्याने सगळेच ग्रामपंचायतीच्या कार्यालयात सचिंत चेहरे करून आळसावत पडले होते. काही वेळाने जेवण आले. निरोप व्यवस्थित गेले नसल्याने जेवण थोडे कमी आले. हा ' बरे नाही, पोटात थोडे दुखते आहे, ' म्हणून मागे राहिला. तास–दोन तासानंतर आणखी जेवण आल्यावर हा पोटभर जेवला. अनंतराव कुलकर्ण्यांच्या ' हे ' बरोबर लक्षात आले. ते म्हणालेदेखील ' तू कुलकर्णी, मी कुलकर्णी. आपल्या देशस्थी परंपरेत हा संकोच बसत नाही. चल. आहे तो चतकोर तुकडा आपण थोडा थोडा खाऊ.' –

असा हा गुणी मुलगा, कष्टाळू व कुशल व्यवस्थापक आज येथून संचलनाचा निरोप घेत होता.

आम्ही सगळेच थोडेफार विमनस्क होतो.

६ एप्रिल १९६८

प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी मध्यंतरी कलकत्त्याला गेल्या असताना, केंद्र सरकार सध्या जितके बलिष्ठ आहे तितके ते पूर्वी कधीही नव्हते असे त्यांनी मोठ्या अभिमानाने सांगितले. आपल्या सरकारच्या बलिष्ठपणाची त्यांनी ही जी ग्वाही दिली ती कोणत्या संदर्भात आणि कशाच्या बळावर याचा विचार केल्यानंतर सध्याचे सरकार जर स्वतःस बलिष्ठ म्हणवून घेत असले तर मग बलिष्ठपणाची व्याख्याच बदलावयास हवी

चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीनंतरच्या गेल्या वर्षभरातल्या देशान्तर्गत घटना पाहताना राज्य सरकारांवरचा केंद्र सरकारचा प्रभाव निश्चितपणे ओसरू लागला आहे असेच कोणीही म्हणेल. आधीच भाषेच्या प्रश्नावर उत्तर विरुद्ध दक्षिण अशी आपल्या देशाची दोन गटांत विभागणी झालेली आहे. या दोन विरोधी प्रवृत्तींचा समन्वय गाठण्यासाठी संसदेच्या मागील अधिवेशनामध्ये केंद्र सरकारतर्फे सरकारी भाषेविषयीचा प्रस्ताव संमत करून घेण्यात आला. काँग्रेस कार्यकारिणीनेही या प्रस्तावावर अगोदर शिक्कामोर्तब केले होते. तरीदेखील त्या प्रस्तावाला मान्यता देण्यास काँग्रेसचे दक्षिण भारतीय नेते तयार नाहीत असेच त्यांच्या वक्तव्यांवरून

## लक्षात ठेवा

दिसत आहे. काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून श्री. निजलिंगप्पा या विवाद्य भाषा–प्रश्नावर जी मते व्यक्त करतात ती मते म्हैसूरचे मुख्य मंत्री म्हणून स्वीकारण्यास जेथे खुद्द निजलिंगप्पा तयार नाहीत तेथे इतरांना दोष लावण्यात काहीच फायदा नाही.

प्रादेशिक भाषा याच शिक्षणाच्या माध्यम झाल्या पाहिजेत असे उच्चरवाने सांगणाऱ्या केंद्रीय शिक्षणमंत्री डॉ. त्रिगुण सेन यांचा बंगाल हिंदीपेक्षा इंग्रजी जवळची भाषा मानतो ही वस्तुस्थितीही नाकारता येण्यासारखी नाही. दिल्लीकर कितीही गर्जना करोत, त्यांचा गंभीरपणाने विचार करण्याची गरज नाही असे जोपर्यंत प्रादेशिक पातळीवरचे काँग्रेस कार्यकर्ते म्हणत आहेत इतकेच नव्हे तर केंद्रीय नेत्यांचा सल्ला धुडकावून मन मानेल तसे वर्तन करीत आहेत तोवर केंद्र सरकार बलिष्ठ झाले आहे या प्रधानमंत्र्यांच्या विधानावर कोणीही विश्वास ठेवणार नाही.

गेल्या वर्षभरात चिघळलेला आणखी एक प्रश्न म्हणजे आसाम राज्याचा. नागांना वेगळे राज्य दिल्यानंतर त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून आसाममधल्या पहाडी प्रदेशातील मिझो बंडखोरांनी वेगळ्या राज्याची मागणी करण्यास प्रारंभ केला आणि त्यानंतर गेली दोन–तीन वर्षे आसामच्या पुनर्रचनेचा प्रश्न असाच भिजत पडला आहे. केंद्रीय मंत्री श्री. अशोक मेहता यांच्या अध्यक्षते-

खाली आसामच्या पुनर्रचनेचा विचार करण्यासाठी एक समिती नेमण्यात आलेली होती. एका केंद्रीय मंत्र्याच्या नेतृत्वाखाली स्थापन करण्यात आलेल्या या समितीची कशी वासलात लागली आणि केवळ मिझो बंडखोरांनीच नव्हे, तर आसाम सरकारनेही या अशोक मेहता समितीला किती किंमत दिली हा इतिहास तर अगदी ताजा आहे. आसामसारख्या पूर्व सीमेवरच्या आणि एका बाजूला पाकिस्तान आणि दुसऱ्या बाजूला ब्रह्मदेश यांनी वेढलेल्या राज्याच्या भवितव्याचा प्रश्न अशा रीतीने दीर्घकाळ भिजत ठेवल्याचे कोणते परिणाम होतात, याची दिल्लीतील राज्यकर्त्यांना नीट कल्पना नसावी. कारण, त्यांना जर तेथे काय घडत आहे याची जाणीव असती तर आसामच्या स्वतंत्र अस्मितेचा दावा करणाऱ्या आणि राष्ट्रद्रोही प्रवृत्तींशी हातमिळवणी करणाऱ्या लचित सेनेचा तत्काळ बंदोबस्त करण्यासाठी केंद्र सरकारने कणखर उपाय योजले असते.

आसाम, मणिपूर, त्रिपुरा, नेफा, नागा प्रदेश आणि मिझो टेकडया या भागांत सध्या कोणत्या प्रवृत्ती मूळ धरू पाहात आहेत याकडे दुर्लक्ष करणाऱ्या केंद्र सरकारने स्वतःच्या बलिष्ठतेचा दावा करणे, खरोखरच हास्यास्पद आहे. गेल्या २६ जानेवारी

# आमचे सरकार बलिष्ठ आहे !

रोजी गौहाटी येथे दंगली होऊन पोलिसांच्या डोळ्यांदेखत आसामेतर व्यापाऱ्यांची दुकाने लुटण्यात आली व नंतर मध्यवस्तीतील बाजारपेठेला आग लावून देण्यात आली. या गंभीर प्रकाराची चर्चा करण्यासाठी दिल्लीत ज्या वाटाघाटी झाल्या, त्यांना हजर राहण्याचीही आसामच्या मुख्य मंत्र्यांना गरज भासली नाही आणि त्यांनी या वाटाघाटींना हजर राहून आपली भूमिका स्पष्ट केली पाहिजे, असे त्यांच्यावर केंद्र सरकार दडपणही आणू शकले नाही. आसाममध्ये घुसलेले पाकिस्तानी नागरिक, चीनच्या मदतीची वाट पाहणारे डावे कम्युनिस्ट, आपल्या सार्वभौमतेचा डिंडिम वाजवणारे नागा आणि मिझो बंडखोर व आसामच्या खोऱ्यातून आसामेतर नागरिकांची हकालपट्टी करण्याची प्रतिज्ञा घेतलेली लचित सेना या सर्व शक्तींनी आपला ईशान्य भारत पोखरण्यास सुरुवात केली असून अखेरीस याची परिणती कशात होऊ शकेल, याचा अंदाज बांधण्यासाठी भविष्यवेत्त्याची गरज नाही.

देशाच्या सीमांबाबत केंद्र सरकार किती उदासीन आहे, याचेही संसदेतील प्रश्नोत्तरांच्या वेळी नुकतेच प्रत्यंतर आले. आपल्या देशाच्या सीमांबाबत निश्चित स्वरूपाची माहिती सांगणे, केंद्र सरकारला जमले नाही. आज आपण कोणती सीमा मानतो आणि या सीमेच्या आत घुसलेल्या शत्रु–राष्ट्रांना हुसकावून लावून आपणा

आपले मानचित्र कोणत्या उपायांनी अभंग राखणार आहोत, असे विचारण्यात आले असताना सरकारला आपल्या देशाच्या सीमा धड सांगता आलेल्या नाहीत. आपला काही प्रदेश चीन आणि पाकिस्तान या शेजारी राष्ट्रांनी व्यापलेला आहे. हा प्रदेश मुक्त करणे हे कोणत्याही स्वतंत्र आणि सार्वभौम सरकारचे परम कर्तव्य असते. या कर्तव्यपूर्तीच्या दृष्टीने केंद्र सरकारने गेल्या वर्षभरात कोणती वाटचाल केली आहे हे ज्या सरकारला सांगता येत नाही त्याने आपल्या सामर्थ्याची ग्वाही देणे धाष्टर्याचे आहे. उत्तर व्हिएटनामवरील अमेरिकेची बॉम्बफेक थांबावी यासाठी किंवा मस्तवाल अरब राष्ट्रांना एकामागाहून एक तडाखे हाणणाऱ्या इस्राएलने आपले आक्रमण मागे घ्यावे यासाठी तळमळणाऱ्या भारत सरकारने स्वतःच्या भूमीवरील आक्रमण शत्रूने मागे घेतले पाहिजे यासाठी कोणती तजवीज केली आहे हा प्रश्न या संदर्भात महत्त्वाचा ठरतो. त्याचप्रमाणे ज्या राष्ट्रांच्या स्वातंत्र्यासाठी भारताचा सदासर्वकाळ आक्रोश चालू असतो त्या राष्ट्रांनी भारतीय भूमीवरील चिनी आणि पाकिस्तानी आक्रमणाचा कधी तरी निषेध केला आहे काय हेही पाहणे आवश्यक ठरते.

## जुन्या इतिहासाची पुनरावृत्ती

चीन आणि पाकिस्तान यांची गोष्ट सोडून दिली तरी सिलोन आणि ब्रह्मदेश यांसारखे आपले छोटे शेजारीही आपल्याला किती किंमत देतात हे नुकतेच आढळून आलेले आहे. अंदमानलगतच्या बेटावर ब्रह्मदेश आपला दावा सांगू लागला असून कच्छतिवु बेटाबाबत सिलोन आपला आग्रह मागे घ्यावयास तयार नाही. मध्यंतरी ब्रह्मदेशचे अध्यक्ष जनरल ने विन भारतात आले होते. त्यांनी आणि आपल्या प्रधानमंत्र्यांनी भारत-ब्रह्मदेश मैत्रीचा पुकारा केला. परंतु हेच ने विन भारताशी बंडखोरी करणाऱ्या नागा आणि मिझो बंडखोरांना चीनमध्ये जाण्यासाठी आपल्या देशातून वाट काढून देतात व आपण त्याबाबत त्यांना दटावू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. या साऱ्या प्रश्नांचा घोळ घालत बसण्याचे काहीच कारण नाही. आपला आपल्या छोट्या–मोठ्या शेजाऱ्यांना बिलकुल धाक वाटत नाही हेच या प्रश्नाचे साधे आणि सरळ उत्तर आहे आणि त्याबरोबर हेही खरे आहे की, जोपर्यंत असा धाक वाटत नाही तोपर्यंत भारताच्या सीमांचा मान राखण्याचे कारण नाही असेच हे शेजारी मानीत राहणार. कोणी उच्च तत्त्वांचा कितीही जोराने उच्चार करो ती तत्त्वे कृतीत आणण्यासाठी सामर्थ्याची जोड नसेल तर त्या उदात्त तत्त्वांची आणि ती तत्त्वे उच्चारणाऱ्याची कुचेष्टाच होत असते. या जुन्या घड्याची सतत पुनरावृत्ती होत असते. आज आपण त्याचा अनुभव घेत असताना प्रधानमंत्री मात्र केंद्र सरकारच्या बलिष्ठतेची ग्वाही देत आहेत. त्यांची ही ग्वाही जितकी विनोदी आहे तितकीच चिंताजनकही आहे.

– सदाशिव पेठकर



शेतीसाठीं
महाराष्ट्र बँक सहाय्य करते.
आपल्या नजिकच्या शाखेस भेट द्या
दि बँक ऑफ
महाराष्ट्र लि.
११९ शाखासह आपल्या सेवेस सिद्ध
खते
बीयाणे

वि ज य तें डु ल क र



# सो ह ळा

एक काळ असा होता—आणि तोही फार लांबच नव्हे—की मराठीतील एकाद्या साहित्यिकाच्या मकाणी पोस्टमन रोजच्या निष्काळजीपणे एक लखोटा फेकून जाई. हा लखोटा खाकी मळकट असे परंतु त्यात त्या साहित्यिकाला सरकारी पारितोषिक मिळाल्याची शुभवार्ता सरसकट सरकारी परिपत्रकांच्या अत्यंत विटक्या, रुक्ष भाषेत कळवलेली असे. तरीही शुभवार्ता ती शुभवार्ताच. त्या शुभवार्तेने उत्तेजित झालेला तो साहित्यिक आपल्या एकंदर भावी मानसन्मानाच्या स्वप्नात मशगुल होऊ पाही, त्याचे कुटुंब पारितोषिकाच्या रकमेत दुप्पट खर्चाच्या बेतांचे अंदाजपत्रक बसवण्याच्या खटपटीला उमेदीने लागे. त्यानंतर पत्रकातील सूचनेनुसार पारितोषिकाच्या रकमेचा स्वीकार करण्यासाठी हा भाग्यवान आणि



**डॉ. त्रिगुण सेन यांच्या हस्ते कै. गोपाल कृष्ण भोबे यांची कन्या पारितोषिक घेताना**

छाया : अरुण राजदत्त

गुणी सरस्वति-सेवक वाऱ्यावरून जणू तरंगत संत्रंवित सरकारी कचेरीत पोचत असे. तिथे कावळादेखील त्याला ओळखत नसे, कुत्रेदेखील त्याची तत्पर दखल घेत नसे, मग या बसा आणि चहापाण्याचे राहू द्याच. मुळात आपण आपणच आहोत हे सिद्ध करण्याची पाळी एकेकदा विचाऱ्यावर येई आणि दोन तथाकथित मान्यवर गृहस्थ यासाठी गळ घालून सरकारी कचेरीत धरून न्यावे लागत. कचेरीतील कारकूनच काय पण शिपुरडेही मराठी भाषेच्या या मानकऱ्याची अक्षम्य उपेक्षा करीत. (बाकी सरकारी ओसरीवरील या पगारी खुशालचेंडूना साहित्यशारदेच्या दरबारातील सर्जनशील प्रतिभेची काय चव ? असे काहीतरी तो उद्विग्न सारस्वत मग स्व– समाधानासाठी म्हणत असे.) अखेर पारितोषिकाची रक्कम हाती पडे. तोवर पारितोषिकाच्या प्राप्तीची सगळी चव जाऊन सरकारी मदतीची भीक स्वीकारणाऱ्या वृद्ध कलावंता-सारखी अवकळा या लेखकाला आलेली असे.

गेले ते दिवस !

या दिवसांच्या तुलनेने काही दिवसांपूर्वी मुंबईतील जे. जे. स्कूल ऑफ आर्टच्या अंगणात एका संध्याकाळी झुळझुळत्या वाऱ्यात, सळसळत्या, डुलत्या वृक्षराजीत, बंदिस्त शोभिवंत मांडवात, सनईच्या सुस्वर वादनात यंदाच्या सरकारी पारितोषिक-

पात्र साहित्यिकांचा झालेला सत्कार खरोखर दृष्ट लागण्यासारखा होता.

मुळात पारितोषिकाची वार्ता देणारी पत्रे आली तीच पांढऱ्या स्वच्छ कागदावर सुबक टंकलेखन केलेली. त्यांत साहित्यिकाला 'महाशय' म्हटले होते. म्हणजे इंग्रजीत 'सर!' वाहाव्वा! एवढ्याने कुठे भागले? साहित्यिकेला संबोधले होते. 'बाईसाहेब' म्हणजे 'मॅडाम!' श्रीयुत किंवा रा. रा. दि. बा. मोकाशी नव्हे, महाशय ऊर्फ सर दि. बा. मोकाशी आणि मॅडम सरिता पदकी! पारितोषिक-वितरण समारंभाला सपत्नीक अथवा स-पती उपस्थित राहण्याची 'विनंती' करण्यात आली होती आणि प्रवासखर्च देण्याचेही आश्वासन लागलीच दिलेले होते. 'शासन आपले उपकृत होईल' असा चक्क उल्लेख होता. (अरे अरे! काय हे भलतेच! पारितोषिके देऊन वर उपकृत कशाला ते व्हायला हवे?) बाहेरगावच्या साहित्यिकांची उतरण्याची मनपसंत सोय केली होती आणि त्यांच्यासाठी बोरीबंदर–दादर आदी स्टेशनांवर ठरल्या वेळी सरकारी दूत वाहनांसह उपस्थित होते! स्टेशनांच्या दूरध्वनिक्षेपकांवरून लेट गाड्यांच्या घोषणांऐवजी येऊ घातलेल्या साहित्यिकांना सूचना दिल्या जात होत्या. (अमुक तमुकांनी कृपया अमुक ठिकाणी यावे. त्यांच्यासाठी महाराष्ट्र सरकारचा दूत तेथे वाट पाहात आहे इ. इ.) एखाद्या परदेशी आसामीच्या इतमामाने बाहेरगावचे मराठी साहित्यिक पारितोषिक–सोहळ्यासाठी मुंबईत येऊन उतरले, म्हणजे पाहा!

प्रत्यक्ष सोहळ्याचे वर्णन ते काय करावे? आर्ट स्कूलच्या इमारतीच्या एका दालनात अव्वल कलाकृतींच्या सन्मानाने गेल्या अनेक वर्षांतील पारितोषिकार्ह ठरलेली मराठी पुस्तके अत्यंत नेटकी मांडलेली होती. (एरवी फूटपाथवर मांडलेलीच ती दिसण्याचे योग फार!) सोहळ्यासाठी आलेले केंद्र सरकारचे शिक्षणमंत्री डॉ. त्रिगुणसेन महाराष्ट्र राज्याच्या शिक्षणमंत्र्यांसमवेत साहित्यिकांच्या घोळक्यात गळ्याभोवतालचा मफलर उपरण्यासारखा सावरीत फिरून जातीने एकेकाशी बातचीत करीत अवघड प्रश्न अत्यंत सहजपणे विचारीत होते. ('व्हॉट ईज युअर फेव्हरिट टाइप? ट्रॅजिडी? ऑर कॉमेडी? आ? वगैरे.) बाजूच्या राजशाही दालनात वेचक अल्पोपाहाराची सोय होती. मांडवाबाहेर सनई वाजत होती. साहित्याच्या पारितोषिकांपेक्षा मोठ्या घरचे लग्न निघावे तसेच वातावरण होते. ठेवणीतल्या कपड्यांतले काही साहित्यिक आणि झगमगत्या साड्यातल्या त्यांच्या गृहिणी, तसेच काही अव्वल साहित्यिकादेखील, या वातावरणात प्रेक्षणीय भर घालीत होत्या.

मांडवातला मुख्य सोहळा श्रीमती सुमती टिकेकर यांच्या 'या कुन्देन्दु तुषार हार धवला'च्या मधुर आलापांनी सुरू झाला. पाठोपाठ अर्थातच 'दुरितांचे तिमिर जावो' आलेच. (जावो कशाला? साहित्यिकांपुरते ते गेल्यातच जमा वाटत होते की!) अर्धवर्तुळाकार व्यासपीठावर आंब्या–केळीच्या झाडांच्या पार्श्वभूमीवर, पाय उच्चासनावर घेऊन मांडी घालून बसलेले तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी,

मफलर गळ्याभोवती टाकून भाषणाचे मुद्दे काढणारे डॉ. त्रिगुण सेन आणि हातची काठी पायाशी आडवी घालून बसल्या बसल्या पगडी झुलवीत विसावलेले-महामहोपाध्याय द. वा. पोतदार हे तीन तरुण वृद्ध गावच्या वागेत गप्पाष्टके टाकीत बसल्यासारखे वाटत होते. यात आपादमस्तक खादीवेषधारी तुलनेने अधिक तरुण मधुकरराव चौधरी चुकून सापडल्यासारखे दिसत होते. दत्तोपंतांची पगडी गृहीत धरूनच सोहळ्याची जागा आणि व्यासपीठाच्या दुतर्फाची नवचित्रकलेच्या शैलीने केलेली पॅनल्स योजण्यात आली की काय, असा भास व्हावा इतकी पगडी या साऱ्यात चपखल बसली होती. तरीपण बहुतेक साहित्यिकांच्या नजरा व्यासपीठामागे चाललेल्या हालचालींवर लागलेल्या होत्या. कारण तिथे प्रसिद्ध टीकाकार प्रा. मं. वि. राजाध्यक्षांच्या देखरेखीखाली पारितोषिकांच्या चळती क्रम लावून रचल्या जात होत्या ! आणि 'हवे काय ?' अशा मिष्किल आविर्भावात राजाध्यक्ष मधून मधून विजेत्या साहित्यिकाकडे चष्म्यावरून वाकड्या मानेचे कटाक्ष टाकीत होते.

## भाषणे

भाषणाला प्रथम उठले औपचारिक प्रथा मोडून सोहळ्याचे अध्यक्ष नामदार मधुकरराव चौधरी. त्यांच्या भाषणाचे दोन भाग पडले. पहिला, संत-पंतादि कवींपासूनची मराठी साहित्य परंपरा वर्णन करणारा भाग. दुसरा, भाषिक आणि शैक्षणिक चर्चा करणारा भाग. पहिला अशा प्रसंगी करण्यायोग्य पण मंत्र्यांकडून साहित्यिकांना प्रसंगाप्रसंगाने फार वेळा ऐकावा लागलेला होता. दुसरा श्रोतृवर्गातील प्राध्यापक साहित्यिकांना किंवा साहित्यप्रेमी प्राध्यापकांना बहुधा उपयुक्त पण इतरांना अनुपयुक्त होता. तरीही, यांचेच खाते पारितोषिके देणार तर ऐकले पाहिजे या कृतज्ञता-भावनेने की काय, एकंदर साहित्यिक समाजाने चौधरींचे भाषण बरेच मनापासून ऐकून घेण्याचा प्रयत्न चालवलेला दिसला. ( एरवी अशा वेळी साहित्यिकांत आपापसातल्या साहित्यिक आणि बिनसाहित्यिक कुजबुजी आणि जांभया सुरू होऊ शकतात.) मधुकरराव चौधरींनंतर साहित्य महामंडळाचे अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आसनावर घेतलेले पाय जणू नाइलाजाने खाली सोडून भाषणासाठी उठले. त्यांनी पारितोषिकांसाठी आलेल्या पुस्तकांचे वर्गीकरण राशीत केले. ( वजनात मूल्यमापन करण्याची प्रथा जुनी झाली वाटते ?– एक उपस्थित साहित्यिक.) ते हातांनी दाखवीत म्हणाले की, ललित साहित्याचा राशी मोठा होता. (डोक्याच्याही वर हात.) वैचारिक आणि तांत्रिक ग्रंथांचा राशी भलताच लहान. (प्रयासाने किंचित वाकून भुईच्या दिशेने एक हात लांबवलेला.) श्रोत्यांना वाटले, हे फारच वाईट झाले. पण तर्कतीर्थ उगीच विशादयुक्त वाटणाऱ्या आपल्या चेहऱ्याने हसून म्हणाले, की ललित साहित्य हे आत्माविष्कारात्मक असल्याने पहिला राशी मोठा असणे, त्यात कथा-बृहत्कथादी (कथा-कादंबऱ्यांना शास्त्रीबोवांचे पर्यायी संबोधन; ) साहित्य जास्त असणे हे चांगलेच आहे. श्रोते मनाशी म्हणाले,

हास्याच्या ! परंतु वैचारिक आणि तांत्रिक ग्रंथांचा मराठीतील राशीही उंचावला पाहिजे हे मग प्रतिपादताना शास्त्रीबोवांनी मराठी साहित्यिकांना आपल्या भारदस्त सुरात एक ' टिप् ' दिली. होमीओपाथी, रेडियोदुरुस्ती असल्या उपयुक्त तांत्रिक विषयांवरचे ग्रंथ पारितोषिकपात्र तर होतातच, पण शिवाय खपतातही इतके चांगले की त्यांच्या आवृत्त्या चटणीसारख्या बाजारातून उडून जातात. ( नाहीतर आत्माविष्कारात्मक साहित्याचा दुकाना दुकानांतला राशी—एक विषण्ण साहित्यिक स्वर.) हिंदी-मराठीची तुलना करताना शब्दच्छलाचे एक उदाहरण शास्त्रीबोवांनी त्यांच्या वाई-कर हिंदीत दिले ते श्रवणीय होते. ते काशीला होते तेव्हाची हिंदी आज राहिलेली नाही. त्यांच्या काळात काशीत अनेक उर्दू-फारसी शब्द हिंदी बोलता-लिहिताना सहजपणे वापरले जात. अलीकडच्या काळात शास्त्रीबोवा काशीला गेले तेव्हा त्यांच्या हिंदी बोलण्यात ' इन्सानियत ' शब्द आला. त्यासरशी काशीचे हिंदी पंडित एकदम धक्का बसावा तसे म्हणाले, इन्सानियत तो यहाँ नहीं हैं. इन्सानियत पाकिस्तानमें होती हैं. यहाँ होती हैं मानवता. इन्सानियतमध्ये वाईट ते काय होते ? पण भाषेच्या शुद्धतेचा अतिरेकी आग्रह धरून असे अनेक चांगले शब्द हिंदीवाल्यांनी भाषेतून घालवून लावले, ती अधिक संस्कृतनिष्ठ आणि बोजड बनवली. शास्त्रीबोवा आपल्या जात्याच विशादयुक्त मुद्रेने समाधानी स्वरांत म्हणाले, मराठीने हे केले नाही. मराठी भाषिकांनी सावरकरांच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वाला वंदन केले पण त्यांचा भाषाशुद्धीचा आग्रह पत्करला नाही. 'स्थानक' ज्यांना म्हणावेसे वाटते ते म्हणतातच पण स्टेशनही मराठीत टिकले, ते मराठीच बनले. मराठी अशीच खुली, वाढती आणि संपन्न राहावी. बाहेरचे चांगले ते तिने घ्यावे, पचवावे आणि पुष्ट व्हावे. विद्यापीठाच्या ' स्तरा 'वर मराठीची प्रतिष्ठापना होण्याचा प्रश्न मधुकरराव चौधरींनी त्यांच्या भाषणात उपस्थित केला होता, त्याविषयी शास्त्रीबोवा म्हणाले की हा प्रश्न रस्त्यात सुटणार नाही ( म्हणजे राजकारण्यांचे हे काम नव्हे ! )तो साहित्यिकांच्या अभ्यासिकेतच सुटणार आहे. कथा-बृहत्कथादी साहित्यातील काल्पनिक पात्रांचे बहुधा काल्पनिक मनोविश्लेषणात्मक प्रश्न सोडून असे काही खरेखुरे प्रश्नदेखील आपण सोडवू शकू हा शास्त्रीबोवांकडून आलेला दिलासा त्यांच्या आधीच्या व्यावहारिक 'टिप'—प्रमाणेच उपस्थित साहित्यिकांच्या डोक्यांवरून गेलेला दिसला. त्यांचे लक्ष व्यासपीठामागे वारंवार वळत होते. तिथे पारितोषिक-वाटपाची तयारी जय्यत दिसत होती. या विभागाचे इन-चार्ज प्रा. राजाध्यक्ष कोणाशी तरी गप्पा करण्यात रंगले होते.

पण भाषणे अजून संपलेली नव्हती. परीक्षक-मंडळाच्या वतीने प्रा. वा. ल. कुलकर्णी उठले. त्यांनी मराठी साहित्यिकांचे लक्ष महाभारताकडे वळत आहे म्हणून त्यांना शाबासक्या दिल्या. शिरवाडकरांचे नाटक ' ययाती देवयानी ', पुंडलिकांची एकांकिका ' चक्र ' यांचा खास गौरव त्यांनी याबद्दल केला. इतिहासाकडे लक्ष

वळवल्याबद्दल 'झेप' कादंबरीचे कर्ते ना. स. इनामदारांना त्यांनी बधाई दिली. कवींनीही आपले लक्ष्य आता महाभारताकडे वळवावे असे त्यांनी 'दाहिने रूख' 'बाये रूख'च्या थाटात सांगितले. बहुसंख्य साहित्यिकांचे लक्ष्य मात्र व्यासपीठामागेच वळत होते. समारंभाला मुले हजर नाहीत याची किंचित विषादयुक्त नोंद घेऊन 'वा. लं.' नी पारितोषिकाची बालगीत पुस्तके प्रौढांनीही वाचावीत, त्यांना ती निश्चित आवडतील अशी गॅरंटी दिली. कोणी काय लिहावे किंवा वाचावे हे सांगण्याची 'वा. लं.'ची तळमळ एवढी अनावर होती की, भाषण संपल्यावरदेखील पारितोषिके वाटण्याच्या आनंद-सोहळ्यात मध्येच उठून त्यांनी दूरध्वनिक्षेपक धरला आणि व्यासपीठावर पारितोषिक घेण्यात गुंतलेल्या जी. ए. कुलकर्णींना, कथा लिहिल्यात, आता एका कादंबरीची अपेक्षा आम्ही तुमच्याकडून करतो असे प्रेमळ पण उच्च स्वरात चमकावले. कोणी काय लिहावे आणि वाचावे हे सांगता सांगता ज्यांनी काही लिहिले होते आणि त्याला पारितोषिकेही देण्यात येणार होती अशा काही लेखकांचे उल्लेख राहून गेले. एरवी कदाचित यामुळे सौजन्य-मूर्ती 'वा. ल.' थोडाफार साहित्यिक असंतोषाचे जनक ठरले असते. परंतु या वेळी असंतोषाला थारा नव्हता. प्रा. मं. वि. राजाध्यक्ष गप्पा थांबवून पारितोषिकांच्या चळतींकडे जाऊन 'कॅच' झेलण्यासाठी क्रिकेटर असतो तसे सज्ज उभे होते.

## नेत्रदीपक सोहळा

यानंतर पारितोषिक-वितरण एकदाचे डॉ. सेन यांच्या हस्ते सुरू झाले. नोबेल पारितोषिके, अॅकेडमी अॅवॉर्डस, फिल्म फेअर अॅवॉर्डस आणि/विश्व, भारत, मुंबई इ. इ. सुंदरीस्पर्धेचा सोहळा, अशा सगळ्यांचे स्मरण देणारा हा आगळा साहित्य-सोहळा होता. झगझगीत प्रकाशझोत व्यासपीठावर पडत होते. दिपल्या नजरेने एकेक साहित्यिक व्यासपीठावर येऊन पारितोषिकाचे लाल सुबक पेटीतले पदक, रिबिनीत बांधलेली प्रशस्तिपत्रकाची गुंडाळी आणि एक मौलिक लखोटा डॉ. सेन यांच्या कौतुकपर उद्‌गारांनिशी स्वीकारीत होता. फोटोग्राफर्सची पलटण त्याची छबी खेचण्यासाठी घडपडत होती. (एक फोटोग्राफर तर व्यासपीठाखाली घडपडला.) कॅमेऱ्यांबरोबरचे 'फ्लॅशेस' उजळून विझत होते. टाळ्या (साहित्यिक श्रोतृसमुदायाच्या मानाने पुष्कळच) वाजत होत्या. प्रा. राजाध्यक्ष दूरध्वनिक्षेपकावरून त्या त्या साहित्यिकाची तारीफ ऐकवीत होते. फिल्म्स डिव्हिजनचा कॅमेरादेखील मधून मधून कर्रर्रर्र करीत चालत होता.

कुठे ते कळकट सरकारी कचेरीत साहित्यिकाने आपली ओळख सिद्ध करण्यासाठी दोन माणसे बाबापुता करीत धरून नेऊन विटक्या मुद्रेच्या कोणा हिशेबनिसाकडून उपकार म्हणून पारितोषिकाची रक्कम पदरचे दहा पैसे रेव्हेन्यू स्टॅम्पासाठी देऊन स्वीकारणे आणि कुठे हा नेत्रदीपक सोहळा !

पारितोषिके वाटणाऱ्याला एक भाषण करण्याचा चान्स असतोच. त्यात तो

मंत्री असेल तर हा अधिकार दुप्पट असतो. डॉ. सेन यांनी हा दुप्पट अधिकार दामदुपटीने वापरला आणि समोरच्या साहित्यिक आणि साहित्यप्रेमी सुविद्य, सुसंस्कृत श्रोतृसमाजाला आपल्या अखत्यारातील शिक्षणविषयासंबंधीचे अनेक पौष्टिक विचार असलेले लेखी भाषण ऐकवले. शिक्षणपद्धतीचा मूलभूतच विचार झाला पाहिजे हा त्यांच्या भाषणाचा सारांश मंत्र्याच्या भाषणाचा सारांश असावा तसा जुनाच होता. ज्ञानाची आजची धाव सांगताना ते म्हणाले की पदवी मिळवेपर्यंत तिच्यासाठी मिळवलेले ज्ञान आज शिळे आणि प्राय: निरुपयोगी होते. हे जाणून बाहेरदेशी यावर चर्चिला जाणारा एक उपाय त्यांनी सांगितला. तो मनोरंजक होता. पासपोर्टप्रमाणे पदवीही दर पाच वर्षांनी नवी करून न घेतल्यास ती बाद समजावी, हा तो उपाय. हा आपल्याकडे अमलात आणावा अशा मताचे मंत्रिमहाशय दिसले. याने बी. ए. एम्. ए. सारख्या पदव्या 'रुस्तुमे हिंद', 'हिंद केसरी' या पदव्यांसारख्याच ठराविक काळाने 'लढून' सिद्ध कराव्या लागतील ही कल्पना कॉलेज विद्यार्थ्यांनी नव्याने एखादी दंगल करावी इतक्या महत्त्वाची खासच होती.

## म. मं. ची मेजवानी

पारितोषिके हाती आलेल्या साहित्यिकांच्या नजरा आता व्यासपीठाकडून उडून समारंभानंतर मुंबई मराठी साहित्य संघ देणार असलेल्या मेजवानीकडे लागलेल्या होत्या. महामहोपाध्याय पोतदार यांच्या 'लाष्टमूफाष्ट' म्हणाव्या अशा भाषणानेच खरे म्हणजे या मेजवानीला आरंभ झाला. अव्वल मराठीतल्या आपल्या चुरचुरीत, प्रशस्त, मुक्त आणि घरेलू शैलीत म. मं. नी समस्त श्रोतृवृंदांचा दिल बघता बघता बहेलावून टाकला. असले सोहळे सुचण्याची सद्बुद्धी झाल्याबद्दल शासनाचे त्यांनी जपून कौतुक केले (ही सद्बुद्धी टिको अशा अपेक्षेसकट !) आणि हे सोहळे पाहण्यासाठी आपले आयुष्य वाढावे, असे आपल्याला वाटत असल्याचे सांगून टाकले. त्यांनी हे सांगताना आपल्याकाळच्या निस्सीम साहित्यसेवकांचे उपेक्षित जिणे वर्णन केले, ते तशा आनंदातही चटका देणारे होते. म. म. म्हणाले की, ते बिचारे काय लिहीत आणि ते किती मोलाचे असे, याचा पत्ता त्यांच्या सहधर्मचारिणीलाही नसे. त्यांच्या वेड्या श्रमांचे, बेचैनीचे, ध्यासाचे महत्त्व तिलाही कधी कळत नसे; मग शासनाबिसनाकडून मानसन्मानाची गोष्टच सोडा. हयातभर त्यातले अनेक हे असे उपेक्षितासारखे साहित्यसेवा करून संपले. भाषणात जाता जाता म. मं. नी साहित्यिकांच्या आणि वाचकांच्याही टोप्या उडवल्या आणि आधीच्या पौष्टिक भाषणांनी जरा मरगळलेल्या साहित्यिक मनांना टवटवीत केले. हास्याची खसखस मुबलक पिकवली; आणि भुका झक्क प्रज्वलित केल्या.

एखाद्या शाही मेजवानीसारखी नंतरची जे. जे. स्कूलच्या आलीशान सभागारातली मेजवानी होती. उंचवर हंड्याझुंबरांत विद्युद्दीप झगमगत होते. निकोप साहित्यिकचर्चांनी आणि हास्यविनोदाने वातावरण फुलले होते. रेशनमध्ये जमा नसलेले उत्तमो-

त्तम पदार्थ यथेच्छ वाढले जात होते. मंत्री, परीक्षक आणि पारितोषिक विजेते एकत्र बसून भोजनाचा समाचार घेत होते. आग्रहदेखील केला जात होता. वर आन्याच्या सहलीची व्यवस्था शासनाने केलेली होती.

समारंभाहून तृप्त पोटाने आणि मनाने परतणारा एक पारितोषिक–विजेता साहित्यिक दुसऱ्या साहित्यिकाला सांगताना जे. जे. स्कूलच्या आवाराबाहेरच्या काळोखात ऐकू आला, खरे म्हणजे हे एवढे असल्यावर पारितोषिके दिली नसती तरीसुद्धा काही वाटले नसते ! ...

महाराष्ट्र शासनाला याहून वेगळे ते पारितोषिक कोणते हवे ?

○


"सारे जग श्वास रोखून बसेल"

असे बेगुमानपणे सांगणाऱ्या हिटलरच्या

झंझावाती पुरुषार्थाची कहाणी

**नाझी भस्मासुराचा**

**उदयास्त**

वि. ग. कानिटकर

**मूल्य : पंचवीस रुपये फक्त**



**तुम्ही राजकमलची चित्रे पाहिलीत का ? मग त्यांच्या बोध चिन्हातली तरुणी करते तसे हात करा पाहू ! मी लगेच डायरी काढली आणि**

---

**प्रकाश टंकसाळे**

---

आज रविवार. पण दिवसभर केलं काय—तर कालच्या घटनांबद्दल विचार ! माझा अजूनही विश्वास बसत नाही त्या घटनांवर. कारण कालचा दिवस म्हणजे एक लघुकथा होती !

कितीक दिवसांत फार फार उदास वाटू लागलं. इतकं की अंथरुणातून उठावसं-देखील वाटलं नाही. तरी पण उठलो आणि ऑफिसमधे फोन करून आलो, येत नाही म्हणून. ऑफिसातही आश्चर्य वाटले असले पाहिजे. बहुवा सहा महिन्यांतली एकमेव रजा असेल कालची. फोन करून आलो तो नजर गेली समोर फळीवर ठेवलेल्या इझलवर. कितीक दिवसांत ब्रश हातात घेतला नव्हता. वाटले एखादे चित्र काढावे. मग इझल काढले. फ्रेमवर कॅनव्हस चढवले. ट्युबज् हुडकल्या आणि ब्रश हातात घेऊन बराच वेळ विचार केला काय काढावे याचा आणि थोड्याच वेळात फ्रेमच्या

# मधली स्थिती

डाव्या कोपऱ्यातून खाली एक वक्ररेषा काढली आणि त्यावर फुले काढली. इंदूरला एका बागेत पाहिली होती तसली.

आराम करून पुन्हा कामाला सुरुवात केली. एखादे फूल उमलले असेल जास्ती पण तेवढ्यातच दारावर टकटक. मी कल्पना करू शकलो नाही कोण आले असावे याची. दार उघडून पाहतो तो ऑफिसमधली स्टॅटिस्टिकल रिपोर्ट करणारी आधुनिका. मिस् कुलकर्णी ! इतके आश्चर्य वाटले की मिनिटभर तिला आत ये देखील म्हणालो नाही. तरीपण ती आपसुकच आत आली.

मग मात्र मी कॉटवरचे कपडे बाजूला सारून म्हणालो––

' बसा. '

नवख्याच्या कुतूहलाने ती खोली पाहात होती. चित्रानेही लक्ष वेधून घेतले तिचे. म्हणाली–' उत्तर भारतात अशी फुले फार असतात नाही ! ' मी रंग, ब्रश आवरू लागलो. तशी ती म्हणाली, ' तुमचे काम चालू द्या. मी पाहात राहीन. मग बोलू आपण. '

तरी पण कुतूहलाने मी खुर्चीचे तोंड तिच्याकडे वळवून बसलो.

' काही काम आहे ?'

' नाही. आज ऑफिसला आला नव्हतात तुम्ही तेव्हा फार कुतूहल वाटले. शिवाय तुमचे एक पत्र आले होते. म्हटले जाता जाता देऊन जावे. '

' तुम्हांला कसा माहीत माझा पत्ता ?'

' वर प्रभू राहतात ना त्यांच्याकडे येते मी नेहमी. तेव्हा पाहिलंय तुम्हाला. शिवाय दारावर नाव आहेच. तुम्ही पाहिलं असेल कधी ना कधी तरी मला इथं?'

' छे ! प्रभू नावाचे कुणी वर राहतात हे देखील मला माहीत नाही. '

' म्हणजे, तुमच्याबद्दल ऐकलंय् ते खरं वाटू लागलंय् मला. '

' काय ऐकलंय् ?'

' तुम्ही फार म्हणजे फार एकमार्गी आहात. '

' अस्सं ?' मी हसलो कारण ते मला अनपेक्षित नव्हतं. ती बोलत राहिली मी ' हं ' ' असं ' म्हणत, ऐकत असल्याची पोच तिला देत होतो, पण माझा विश्वास बसत नव्हता की ऑफिसात शिष्ठ समजली जाणारी ही आधुनिका माझ्या खोलीत

येऊन, तेही अचानक, जवळकीने बोलत आहे, माझ्याबद्दल तिने बरीच माहिती जमवली होती. आणि प्रश्न विचारून ती पडताळून पाहात होती.

'माझ्याबद्दल बरीच माहिती मिळाली आहे तुम्हाला.'

'सहसा माझा प्रयत्न हाच असतो. एखाद्याची ओळख करून घेताना त्याची आवश्यक माहिती असावी आपल्याला. म्हणजे होतं काय? आपणाकडून तो कधी दुखावला जात नाही !'

ती बोलत राहिली, मी ऐकत राहिलो.

मधेच विचारले. 'चहा कॉफी काय घेणार ?'

'नको.'

'असं म्हणू नका. प्रथम आलात तुम्ही इथं.'

'बरं पण एका अटीवर. मी करीन चहा.'

'बरं.'

मी तिला चहा, साखर, दूध वगैरे दिले. आणि तिने समोरच टेबलावर असणारा स्टोव्ह पेटवला. मी ब्रश घेतला पण एखादे फूल वाढवण्याशिवाय काही करू शकलो नाही. समोरच्या त्या ओणव्या डहाळीकडे पाहून मी शोध घेऊ लागलो. त्या कॅनव्हसवर आणखी काय काढावे म्हणजे बॅलन्स येईल ? पण मधूनच लक्ष तिच्याकडे जायचे म्हणून तो शोध अपुराच राहिला. पुन्हा क्षणभर चित्त कॅनव्हसवर एकाग्र झाले. तेवढ्यातच स्टोव्ह विझवून चहाचा कप तिने माझ्याजवळ ठेवला. म्हणाली–

'मी आल्याने तुमचा मूड तर गेला नाही ना ?'

'छे ! मी फक्त शोधत होतो या चित्रात आणखी काय काढलं म्हणजे भरीवपणा येईल. पाहा तुम्हांला काही सुचतं का ?'

'आता जर तुम्ही माझ्या हाती हा ब्रश दिलात तर मी या डहाळीमागे दोन त्रिकोणी डोंगर आणि त्यामध्ये सूर्य मावळता किंवा उगवता (हे तीन शब्द डोळे मिचकावून) म्हणाल तो, आली तिथून वाहणारी एक नदी इत्यादी, इत्यादी, वगैरे वगैरे काही तरी काढीन.'

मी हसलो.

'पाहा हसलात की नाही ?'

पुन्हा मला हसावेसे वाटले. कारण लहान मुलाच्या आविर्भावात प्रश्न विचारला तिने.

खरं म्हणजे मला कंटाळा आला होता, तरी तिने फारच आग्रह केल्यामुळे तिच्या बरोबर बाहेर पडावे लागले. एखाद्या खुबसुरत–उठक प्रकारच्या पोरीबरोबर बाहेर पडायची पहिलीच खेप. जरा 'हेच' वाटत होते. माझी चुळबूळ तिने जाणली. कारण लगेच ती म्हणाली–

'ऑक्वर्ड वाटतंय का तुम्हांला ?'

मला उत्तरच देता येत नव्हते. उगीच मुळमुळीत काही तरी बोलून चालू लागलो.

काही वेळानंतर ती म्हणाली—

'आज ऑफिसमध्ये तुमच्याबाबत चर्चा होत होती. बऱ्याच दिवसांनी रजा घेत-लीत तुम्ही.'

'साहजिकच आहे' मी म्हणालो, आणि ऑफिसच्या गप्पा मारता मारता, माझ्या बोलण्यात मोकळेपणा आला. शेवटी काही काही लोकांच्या लोचटपणाचा राग येऊन म्हणाली—

'अस्सा वैताग येतो की वाटते नोकरी सोडून द्यावी. आणि खरं सांगायचं म्हणजे महिनाभर पाहीन, आणि खरोखरच नोकरी सोडून देईन.'

मी तिच्याकडे पाहू लागलो. उगीचच वाटले हिने नोकरी सोडल्यावर आपला विरंगुळा जाईल. समोर काम करत असते तेव्हा वाटते पाहात बसावे हिच्याकडे. कितीकदा पाहताना हिच्याभोवती आपण कल्पनांचे जाळे उभे करतो. आणि विचा-रात गुरफटून जातो.

पुन्हा कोणता तरी विषय तिने काढला. हळू हळू ती ऐकू लागली अन् मीच बोलू लागलो. नंतर एकदम मला जाणवले, कधी आपण इतके बोलत नाही. ऑफिसात नाही अन् इतरही कुठे नाही. आज फार बोललो आपण आणि मी शांत राहिलो. तीच म्हणाली मग, 'शांत का राहिलात, बोला ना ?'

'कंटाळा येतो खरे म्हणजे बोलायचा.'

'असं ?'

परस्परांकडे पाहून आम्ही हसलो. अकारणच.

'पिक्चरला येणार ?'

'छे हो ! मी तर कधीच सिनमा पाहात नाही.'

'मला कंपनी देण्यासाठी पाहाल तर आनंद वाटेल मला.' लाडिकपणे असंच आणखी काही बोलली आणि मी कबूल झालो. आणि आम्ही थिएटरमध्ये गेलो. सिनेमा होता 'कागज के फूल.'

सिनेमावर चर्चा करीतच थिएटरबाहेर आलो तेव्हा म्हणाली, 'फार भूक लागलीय हो.' खरे म्हणजे इंटरव्हलमध्ये बरेच खाणे झाले होते. पण बळेच मला ती एका बड्या हॉटेलात घेऊन गेली. एका स्पेशल रूममध्ये आम्ही गेलो. मला उगी-चच कसंतरी वाटू लागलं.

ऑर्डर दिल्यानंतर निवांतपणे एकमेकांसमोर आम्ही बसलो. कधी कधी बोलताना नजर मिळायची तेव्हा हसू यायचं विनाकारणच. ती मग टेबलावरच्या मिठाच्या बाटलीशी चाळा करू लागली आपल्याच मूडमध्ये. मी पाहात राहिलो. एकदम वाटले, 'हिची नाजूक बोटे हातात घेतली तर आपण ?' पण नंतर एकदम विचार आला. मी तिला म्हणालो, 'तुम्ही राजकमलची पिक्चर्स पाहिलीत का ?'

'का ?'

'नाही विचारतो.'

'आवडीने पाहते मी अजूनही.'

'मग त्यांच्या बोधचिन्हातली तरुणी करते तसे हात करा पाहू जरा.'

'काहो ?' हसत तिने विचारले.

'मघाच्या चित्राबद्दल कल्पना सुचलीय.'

'असं ?' आणि तिने हात तसे केले. तिची लांबसडक बोटे. गोरा नाजूक हात फुले टाकत आहेत अशा आविर्भावातील तिची ओंजळ. मी एकदम माझी पॉकेट डायरी काढली आणि पेनने ती पोज काढली. एक-दोन रेषा काढून त्या 'डहाळीचे रोप त्यांना दिले.

'पाहू ?'

मी दाखवले.

'अय्या, किती सुंदर ही आयडिया'

मीही खूष झालो माझ्यावर. कारण चित्राला एकदम बॅलन्स येणार होता त्या हाताने.

खाण्याचे पदार्थ आले. चमचमीत पदार्थांचा स्वाद घमघमत होता. बराच काळ भटकणे झाले होते, थोड्या वेळापूर्वी वाटत होते. बरंच खाणं झालंय, तरी पण तोंडाला पाणी सुटलेच. तिने चमचा हातात घेतला. म्हणाली, 'खाण्यापूर्वी एक अट ! हं !'

'कोणती ?' म्हणणार होतो. 'फारच अटी असतात बुवा तुमच्या.'

'माझ्या मनात तुमच्याविषयी एक शंका आली आहे. ती खरी असेल तर हे बिल तुम्ही दिलं पाहिजे. नाही तर मी देईनच.'

'शंका तर बोला मग पाहू.'

'तुम्ही लघुकथा, कविता लिहिता ना ?'

'छे हो !' पटकन मी म्हणालो.

'खोटं बोलता ना तुम्ही हे ?'

'छे ! तो आपला प्रांतच नव्हे. पेंटिंगची आवड आहे मला. माहीतच आहे तुम्हांला, पण कशावरून म्हणताय तुम्ही हे ?'

परवा 'काचेची खोली' कथा वाचली सत्यकथेत. दोन-चार दिवस त्यावर फार विचार केला मी. त्याच्या लेखकाबद्दल कल्पना करू लागते मी. उदास, गंभीर मनः-प्रवृत्तीचा लेखक असावा, अज्ञाताची ओढ असणारा असावा असं वाटू लागलं मला. परवा तुम्ही काम संपवून लवकर बाहेर पडणार होता. पण नेहमीप्रमाणे मागचा पडदा सरकवून खिडकीच्या काचांतून खाली पाहात उभे राहिलात आणि गेलात नेहमीच्याच शांतपणाने. त्यानंतर कुतूहलाने मीदेखील तिथून खाली पाहात उभी

राहिले. पाहताना एकदम आठवली ती कथा. वाटले तिचे लेखक, नायक तुम्हीच असाल. नेहमी शांत, गंभीर असणारे, नजरेत नेहमी कशाचा तरी शोध असणारे !'

'तुम्ही म्हणता ना मिस् कुलकर्णी हे मला जर लागू पडलं असतं तर मला फार आनंद झाला असता. पण संबंधच नाही वाङ्मयाशी; फक्त एक वाचकाचा सोडल्यास.'

'मी विश्वास ठेवते तुमच्यावर. फार आशाभंग झाला माझा. वाटत होते कल्पनेची झेप असूनही गंभीर अवस्थेत वावरणाऱ्या त्या लेखकाला भेटून त्याच्या गांभीर्याचे कारण विचारावे. त्याला एक नवी ओढ लावावी. मला फार वाटतं हो अशा माणसावर प्रेम करावं. त्याच्या आयुष्यात नवे दालन उघडावे आपल्या प्रेमाने. अकृत्रिमरीत्या ती बोलत होती. नेहमीप्रमाणे मी ऐकत होतो. चलबिचल वाढत होती.

'काय नाव म्हणालात त्या लेखकाचे ?'

'अश्क.'

'अश्क म्हणजे ?'

'अश्रू !'

'अश्रू !' मीही उत्तरलो. गंभीरपणाने.

'आता खायला सुरुवात करा. थंडगार झालाय मामला सगळा.'

आणि आम्ही खायला सुरुवात केली. नेहमीप्रमाणे मधूनच आम्ही अचानकपणे परस्परांकडे पाहात होतो. खाणे संपले. गरम कॉफीनंतर तिनेच बिल दिले. आम्ही


काळ्याभोर रेशमी विपुल केसांकरिता

**डोंगरे**

# अप्सरा

हेअर ऑईल

उत्पादक

**के. टी. डोंगरे अँण्ड कं., प्रा. लि.,**

मुंबई, कानपूर, नैरोबी ( आफ्रिका )

**डोंगरे बालामृताचे**

बाहेर पडलो. मी सिगरेटस् घेतल्या. ओढत परत चालू लागलो. एका चौकात आल्यावर ती म्हणाली–

'मी जाते आता. घरी वाट पाहतील.'

'मघाशीच म्हणालात सांगून आलात म्हणून!'

'तरी पण काळजी असतेच हो.'

'हो. साहजिक आहे. बसने जाणार ?'

'नाही. टॅक्सीने!'

'बोलावू ?'

'हो.'

थोड्याच वेळात टॅक्सी मिळाली. ती आत बसली. टॅक्सी चालू लागणार तेवढ्यात ड्रायव्हरला थांबायला सांगून तिने मला बोलावले–

'तुम्ही फार भोळे आहात.'

'काहो ?'

'हे पत्र मी द्यायची विसरले. पण ते मागून घ्यायचे तुम्ही पण विसरलात.'

'लक्षात राहात नाही कितीकदा.' मी म्हणालो.

आणि पर्समधून तिने पाकीट काढून दिले. आणि टॅक्सी भरकन मिसळली अंधाऱ्या गर्दीत. मी फुटपाथजवळच्या दुकानाशी आलो. पत्र फोडले. घरून पत्र आले होते. तिचाच विचार करीत खोलीवर गेलो. विश्वास बसत नव्हता. ती माझ्या खोलीवर येईल. मला बाहेर काढील. सिनेमाला नेईल आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे माझे गुपित मला सांगेल. वाटले किती सुंदर संधी होती. एक तरुणी किती भावनात्मक ओढीने विचारत होती आपणाला. आणि आपण खोटे बोललो. मनातच प्रश्न आला. 'आपण कबूल केले असते तर काय झाले असते ?'

मी गोड गोड कल्पना करू लागलो.

दार उघडल्यावर समोर इझलवर फ्रेम उलटी करून ठेवली होती. ती दिसली. लगेच हॉटेलात सुचलेली कल्पना पूर्ण करायच्या मागे लागलो. खरं म्हणजे रात्री रंगकाम करीत नाहीत. पण माझी नजर तयार होती. ती असली बंधने पाळीत नव्हती. पण पॅन्टमध्ये बराच माल होता. तो सगळा उपसून टेबलावर ठेवला. त्यात ते पत्रही होते. सहज माझं लक्ष त्यावर गेले. त्या पाकिटावर काही लिहिलेले होते. मी पाकीट घेतले. पाहू लागलो. ती एक कविता होती.

कल्पनेतील मत्प्रियेगे
येशील का तू कधी अचानक–
कल्पनांना अर्थ द्यावया ?
स्वप्नातील नायिके गे
देशील का तू आगमनाने

अस्थिर मनास आधार प्रीतिचा !
वेडा मी गे – पिसा मी
प्रत्येक क्षणी अपेक्षितो तुझीच प्राप्ती
मम प्रीति–
नाव तुझे–
शांती ! शांती !! शांती !!!

कविता माझीच होती. हस्ताक्षर होते तिचेच. मी एकदम आश्चर्यचकित झालो. 'कविता तिला कुठे मिळाली ?' प्रश्न पडला. उत्तर सापडेना. नंतर आठवले ऑफिसमध्ये टेबलावर ब्लॉटिंगपेपरखाली ठेवला होता तो कागद. कामात असतानाच तिच्याकडे पाहताना सुचली होती. आणि तीच तिने माझ्या नाकबुलीनंतर पुरावा म्हणून माझ्याकडे दिली होती. ब्रश तसाच ठेवून बसलो. अस्वस्थपणे शांती, शांती, शांती म्हणत झोपेची वाट पाहात पडून राहिलो. झोप येईना म्हणून दिवा विझवला आणि गडद अंधारात दोन ओळी सुचल्या–


शांत शांत रात्री आता स्वप्नांचीच आराधना
स्वप्नीच्या नायिके गे ये पुन्हा तू ये पुन्हा

अंधारातच पेन्सिलीने त्या भिंतीवर लिहिल्या. आणि एकदम आठवले 'आपण तिला विचारायचे राहिलेच ती कुठे राहते म्हणून' म्हणून आज रविवारी भेटता आले नाही. कितीकदा तिला भेटायची ओढ वेडी करू लागली. पण काहीच करू शकलो नाही. अशी मधली स्थिती उद्या ऑफिसला जाईपर्यंत राहणार आहे, आताही शांत रात्री वाटतंय अगदी काल रात्रीप्रमाणे म्हणावं–

**शांत शांत रात्री आता स्वप्नांचीच आराधना**
**स्वप्नीच्या नायिके गे ये पुन्हा तू ये पुन्हा !**

O

१३ एप्रिल १९६८



# पुस्तके

'गुंतागुंत – निरगाठ – उकल' छापाची उत्कंठावर्धक लघुकथा आता मराठी कथा वाङमयात जरा मागे पडलेली आहे. वाङमयाच्या सर्वांगीण स्वरूपाबरोबरच कथा-वाङ्‌मयही जास्त जास्त तरल, हळुवार, संवेदनाक्षम आणि प्रतिमाग्राही बनत चालले आहे. उंचावत आहे. आजची कथा ही कथानकाच्या बंदिस्त चौकटीत अडखळणारी नाही. (अर्थात तिला कथानकाचे वावडेही नाही.) संवेदनाक्षम लेखकाच्या गडद अनुभूती जेव्हा स्थलकालव्यक्तिसापेक्ष असा एखादा आकार धारण करतात तेव्हा आजची कथा जन्म घेते. त्या त्या अनुभूतीच्या परिमाणांनुसार मग त्या त्या कथेचे अर्थाकार घडतात. कुठे तिला आदि– मध्य – अंत अशी क्रमवार वाट सापडते. कुठे ती एखाद्या उन्हाच्या कवडशाप्रमाणे नुसतीच विशिष्ट स्थलापेक्षी असते नि नकळत मंदमंद सरकत असते. महत्त्व असते ते त्या कथेत रूप धारण करणाऱ्या अनुभूतीला, त्यातून डोकावणाऱ्या जीवनाला.

आजच्या साहित्यातील अनुभूतींची विविध रूपे आजच्या कथांनी प्रकटवलेली आहेत. सहानुभूतीची कक्षामर्यादा विस्तारून ही अनुभूती खूपच व्यापक होऊ लागलेली आहे. साक्षातानुभवाकडे झुकू लागलेली आहे. आणि त्यामुळे ती अधिकाधिक जिवंत स्वरूपात जास्त-जास्त बारकाव्यांनिशी शब्दबद्ध होऊं लागलेली आहे. अर्थभावनांचे अनक भिन्नरंगी सूक्ष्म पदर त्यात जीवनपट विणू लागलेले आहेत. त्यामुळे आजच्या कथा व्यक्तींनी वा पात्रांनी घडलेल्या नसून व्यक्तिमत्त्वाचे विविध पलू दाखविणारे ते आकृतिबंध आहेत.

**निशिकांत मिरजकर**



खळाळ

# कथेतून साकारलेल्या अनुभूती

'खळाळ' हा आनंद यादवांचा कथासंग्रह आजच्या मराठी कथेच्या प्रवासातील प्रतिनिधी ठरावा. कथेची रचना आणि अनुभूतीचे आकारग्रहण यांची हळुवार सांगड घालून त्यांनी यातील कथांची निर्मिती केलेली आहे. कुठेकुठे क्वचित या दोन्हीपैकी एकाच घटकाने जास्त प्रभावीपणा धारण केलेला आहे; पण एकंदरीत या कथासंग्रहातील कथांमधून जिवंत उत्कट अनुभूती प्रभावीपण साकार झालेल्या आहेत. कथेच्या रचनेच्या तांत्रिकतेच्या आहारी न जाता, शब्दांच्या प्रभावात न गुरफटता, पाल्हाळात न वाहवता आणि भाबडचा भडकपणात विरघळून न जाता आपल्या अनुभूतींचे प्रभावी स्वरूप अधिकृतपणे या कथांत रंगविण्यात आनंद यादव यशस्वी झालेले आहेत. त्यामुळेच या कथा नुसत्या दिपवीत नाहीत, नुसत्या आवडत नाहीत; तर त्यांचा ठसा मनावर उमटतो. हुरहूर लागून राहते.

कुठून कुठून या अनुभूती लेखकाने घेतलेल्या आहेत! सूक्ष्म निरीक्षण, अपार सहानुभव आणि उत्कट जीवनोन्मुखता यामुळे रोज आढळणाऱ्या गोष्टींतूनच या तीव्र अनूभूतींनी आकार घेतला आणि मग त्यांच्या कथा बनल्या. धारदार कथावस्तू, आवेगी भावसंवेदना आणि त्या सर्वांशी एकजीव झालेली वर्णनशैली ही या कथांची वैशिष्टचे ठरली. किंबहुना ही वैशिष्टचेही वेगवेगळी जाणवत नाहीतच. सगळचांचा एक सामुच्चयिक परिणाम तयार होतो – आणि तोच संदर्भित अनुभूतीचा आकृतिबंध असतो. कथेच्या प्रवासाबरोबर हा आकृतिबंध जास्तजास्त स्पष्ट आणि म्हणून जास्तजास्त उत्कट होत जातो. आणि ही अनुभूती अगदी उत्कर्षापर्यंत पोचल्यावर कथा विराम घेते. संपते. त्यामुळे मनाला हुरहूर लागून राहते. " – जातीस? जा. . मन चेचल्यागत व्हाय लागलंय बघ तू जातानं. हे घे कुलूप, घाल बाहेरनं नि सकाळनं जरा लौकर दार उघड; जळणाला जायाची हाय." – ही 'मुंडरी' या कथेची अखरची वाक्ये किंवा " – आणि पाच म्हयन्यानं. जा आता. मान वझ्यानं लईच अवघडली तुझी. चेहऱ्यावर घाम आलाय. बोलवंना झालंय तुला... " या 'रकमा'च्या बोलण्यास " जातो. ठिगळं लावून घेऊन येतो."

हे रामूने दिलेले विषण्ण उत्तर अशासारखा टोकदार शेवट पाहून कथेतल्या अनुभूतीचे निनाद घुमतच राहतात. 'राजावाणी,' यासारख्या कथेमध्ये एक लक्ष्यणीय व्यक्तिमत्त्व आढळते. खरोखरच 'राजावाणी'. त्यालाही मंद कारुण्याची एक झालर असते. त्यामुळे त्याला वेगळाच उठाव येतो. एक चांगले भावचित्र उमटून जाते. 'वारकरी' या कथेतील संसाराने भागलेल्या वारकऱ्याला एक निवांतपणाची आस लागलेली असते. ही आस ओलसर असते, पण पोकळ, भकास नसते. अनुभूतीची तीव्रता त्यातून उमलून येते. 'वरवार' या कथेतून घडणाऱ्या सुन्न जीवनाच्या (आणि मरणाच्या) दर्शनाचा पल्ला खूपच मोठा असल्याचे जाणवते. अनुभूती धारदार बनते. सजीव होऊ लागते. "मनात असतील तेवढी हिरवी पानं उघडी करून त्येंच्या सावलीत थंडपणानं बसलेली झाडं" एखाद्या कथेत दिसतात आणि अनुभूतीला एक निवांत आकार येतो. झाडांच्या मनातील पाने उघडी होणे आणि त्यांनीच त्यांच्या सावलीत थंडपणे बसणे या कल्पनेने मनाच्या अनुभूतीचे निसर्गाशी एकदम एकसंध संश्लेषण होते. संवेदनाची प्रतीती देण्याचे सामर्थ्य तिच्यात येते. प्रतिमेच्या जवळची वाट तिला गवसते. "ऊर तरण्या माणसाच्या छातीवर धावून गेल्यागत वाटायचा. काळजाच्या देठाला वड लागायची," यासारखे एखादे एकदम मनात घुसणारे वाक्य पाहिले की अनुभवाचा जणू साक्षात प्रवेश तिथे होतो. सगळे जणू डोळ्यासमोर दिसते. मनाला खोलवर जाणवते. पाल्हाळ न करता आवश्यक गोष्टीच नेमक्या भेदकपणे सांगितल्यामुळे 'वरातीचा शालू' यासारखी कथा कमालीची टोकदार झालेली दिसते.

## एकसंध चित्र

हे सगळे होण्यासाठी कमालीची लेखनपूर्व आत्मनिष्ठा आणि तीव्र लेखनगर्भ आत्मनिष्ठा यांचे एकमेकांत गडद मिलन व्हावे लागते. लेखकाच्या व्यक्तित्वात अनुभूती मिसळून जावी लागते. यादवांच्या एका कथेत "माणसाच्या मनातल्या मनात कायबाय चालतंय्; बाहीर कुणालाच काय दिसत न्हाई; तशी ती मोट थंडगार पाणी भरलेल्या हिरीच्या मनात उतरणारी... वर येऊन पाटात पाणी वतायचं. खळखळून त्येला हसवायचं. पाटाला थरारून सोडायचं." अशा तऱ्हेचे वर्णन येते तेव्हा हीच गोष्ट दिसते. माणसाचे मन आणि विहिरीचे मन. फरक नाहीच. निदान लेखकाला तो जाणवत नाही. त्याच्या अनुभूतीत सर्व एकवटून येते. उत्कट होते. मग मनाचे व्यापार साहजिक मोट, विहीर, पाट यांच्याकडे जातात. ती एकमेकांना हसवतात. थरारून सोडतात. कथेत एक वातावरण तयार होते. आपसूकच चेतनोक्तीचा तो एक सहजगम्य आणि अपरिहार्य आविष्कार ठरतो. या संग्रहातील कथांत हे सर्वत्र आढळते.

यादवांच्या वर्णनशैलीचा वेगळा विचार करावासा वाटतो तो अशा ठिकाणीच. त्यांची वर्णनशैली कथेला खुलविण्यासाठी, सजविण्यासाठी नाही. कथेची चौकट

आणि अनुभूती यांची सांधेजोड करून त्यांना एकजीव करण्याचे, त्यांचे पृथकत्व एकमेकांत घोटून टाकण्याचे कार्य ती करते. 'वरातीचा शालू' या कथेत जुनाच शालू अंजना अपूर्वाईने नेसते तेव्हाचे वर्णन उदाहरणादाखल इथे सहज सुचेल. मनाला हळुवारपणे जाणवणारे संवेदनाक्षम असे हे वर्णन अनुभूतीला नकळत दृश्य मानसाकार देते. "पायाखालच्या घोंगड्याला समाधान वाटलं" यासारखे प्रतिकात्मक वाक्य तर अगदी मनाच्या गाभ्याचा वेध घेते. भावनात्मक परिणाम साधते. अंजना तिच्या भावविश्वाची ताणलेली अनुभूती आणि वाचकांची समरसता यांची पोतदार वीण गुंफते.

कधीकधी तर यादवांची भाषा इतकी तरल आणि उत्कट होते की काव्यमय प्रतिमेचे रूप धारण करते. संवेदनांची अनुभूती घडवते. त्यांचे संश्लेषण घडविते. "रानभर मोटंचा नाद हातरला," "तिच्या अंगावर हळद पिकलेली," "कवळ्या काकडीगत गोरेली बोटं बघितल्याबरोबर तोडून खायची वासना व्हावी" यांसारख्या प्रतिमांच्या भाषेतून अनुभूतीचा स्वाद, स्पर्श, दृश्य नि नाद या उत्कट संवेदनांची तीव्रता, त्यांचे आवाहकत्व ओथंबून आलेले दिसते. "मागच्या शेणी त्यांच्या माकरीकडं डोकावून बघत बसल्या." किंवा "मोट हिरीतून बाहीर येऊन कवतिकानं तानीला बघायची नि तिच्या घुण्यासाठी पाणी वतून जायची." यासारखी चेतनोक्ती यादव अशा कौशल्याने योजतात की ती कथेच्या ओघाशी सहजी एकजीव बनून जाते. अनुभूतीचे ते स्वयंसिद्ध रूपच वाटते. चेतनोक्ती प्रतिमारूप बनून जाते.

'कथेतली पात्रे' हा वेगळा भाग यादवांच्या कथांत उरत नाही, इतकी त्यांची नि पात्रांची सहानुभूती (sympathy) एकवटून जाते. अनुभूतीमुळे तयार झालेल्या आकृतीच्या बाह्यरेखा आखण्यासाठी ही पात्रे अवतरलेली असतात. त्यामुळे त्यांच्या मनातले विचार यादवांच्या लेखणीतून कथेच्या ओघात सरळसरळ थेट उतरत जातात. त्यावर लेखकाची मखलाशी, मल्लीनाथी, निवेदन करण्याची जरूर राहात नाही. एक परिपूर्ण नि सजीव असे एकसंघ भावचित्र आपोआप तयार होते.

असे हे यादवांच्या कथांचे स्वरूप. अनुभूतीचे उत्कट रूप टिपणारे. म्हणून ओलसर, हळुवार बनलेले. आतापर्यंत त्याच्या स्वभावधर्माचा परिचय करून दिला. पण इथे हेही सांगणे आवश्यक आहे की यादवांना हे नेहमीच सोळा आणे जमलेले आहे असे नाही. कुठेकुठे ते घसरलेले दिसतात. रचनेच्या, डौलदारपणाच्या, सजावटीच्या नादात हरवतात आणि मग अनुभूतिचित्राचा हळवा उत्कटपणा झाकोळून जातो. नकळत किंचित कृत्रिमतेचा तलमसा बुरखा त्याच्यावर चढतो. "हिरीकंडच्या वेटावरनं वाऱ्याची लाट गेली. कळकाचं ब्याट ताल धरून हिरीवर वाकू लागलं." हे सृष्टिवर्णन तानीशी गुजगोष्टी करणाऱ्या येशाच्या मनातल्या तालाला समभाव म्हणून यादवांनी वापरले आहे. पण आतापर्यंत फुलत गेलेल्या प्रतिमांच्या सहजभाषेत मध्येच ते कृत्रिम वाटते. मुद्दाम समांतर टाकल्यासारखे वाटते. लेख-

काचे अवधान रचनेकडे वळलेले जाणवते. गामा अलग पडतो. एकसंघपणा जातो. त्याच कथेच्या अखेरीबद्दल हेच म्हणावेसे वाटते. तानी निघून गेल्यावर येशा नाराज होतो. बैलांशी धुसमुसळेपणा करतो. त्याचे मन ढवळल्यागत होते. आणि नेमका याच वेळी मोटेचा सोंदूर धाडदिशी तुटतो. इथे अनुभूतीचा आकृतिबंध निष्कारण ताणला जातो. त्याचा एकजिनसी सुबक घाट बिघडतो. तोल ढळतो. समांतरत्वाचा निष्कारण हव्यास धरून कृत्रिमता येते. मग आधीच्या एकजीव अनुभूतीवरून जे हळवे संवेदनाचित्र तयार झालेले असते, तेही शिथिल होते. गोठून जाते. हा एवढा शेवटचा भाग नसता तर जास्त बरे झाले असते असे वाटत राहते.

## कथेतील वेगळेपण

पण हे कधी कधीच होते. खास ग्रामजीवनातल्या भेदक अनुभूतींशी एकरूप झालेले यादवच बहुशः सर्वत्र दिसतात. ठिकठिकाणी त्यांची वैशिष्टये जाणवतात. मजुरीच्या बैलांसाठीही आपला पगार पुढे ढकलण्याची तयारी असलेले भाबडे मन कुठे दिसते. नि अशा हृद्य भावच्छटा मनाला हेलावून जातात. पारूचे पोरगे गुटः गुटीत होते– हे सांगताना पाटीलबाईच्या पोराची सुरकी त्याला बरोबर बसायची हे यादव सहज सांगून जातात नि त्यात दडलेले कितीतरी अर्थ त्या वाक्याचा वळवेपणा गोंजारत राहतात. " जगातली पहिली कळ पोराच्या कानाला चावली नि तिच्या मोबदल्यात त्याला एवढ्याएढ्या काळ्या दोऱ्याचं दोन तुकडं कानात घालायला मिळालं. " अशासारख्या धारदार वाक्यांनी साध्या साध्या गोष्टीतसुद्धा यादव एकदम जीवनाला हात घालतात. ' पैला पोरगा....' नरसू एवढंच बोलला आणि त्याचं डोळं खोपड्यातल्या अंधारावर सरपटत जाऊन अंधार उकरू लागलं. " यासारख्या वर्णनातून मनाला भिडणारी गडद अर्थवलये दडलेली असतात, तर पारूच्या घरच्या परिस्थितीचे पाल्हाळाने, भडकपणाने, कळवळून न सांगता नुसते वस्तुनिष्ठतेने रंगवलेले, पण कदाचित म्हणूनच जास्त विदारक वाटणारे चित्र साक्षात दारिद्र्याचे दर्शन घडविते. मनाला सुन्न करून टाकते. ' सासुरवाशीण ' यासारख्या कथेमध्ये एका हळुवार मनाच्या कोंडलेल्या वेदनांचे प्रत्ययकारी चित्र आढळते. प्रातिनिधिक असूनही ते वैयक्तिक असते. संभाषणाच्या पद्धतीने सांगि- तलेले असल्याने त्याला विशेष उठाव, चटकदारपणा आलेला असतो. तर ' उनाचं ' या कथेत आठवणीवरून आठवणी निघत जातात. मनाचा गोफ उलगडला जातो. आणि अगदी हुरहूर लागून राहते. सगळेच इतके हळुवार असते की पुनः पुन्हा त्यात रमावेसे वाटते. कमालीचा नाजूकपणा कथाकृतीला प्राप्त होतो. भावनांचे एक धूसर पण तरीही रेखीव असलेले ओलसर चित्र तयार होते. सगळी कथाच यामुळे रम्यकरुण बनून जाते.

अशा या यादवांच्या कथा आहेत. त्यांनी घेतलेली अनुभूती एकही पदर न विसकटता या कथांमधून आविष्कृत झाली आहे. निसर्ग, निवेदन, कथा, पात्रे

वगैरेचे आकार आणि घाट या अनुभूतीच्या अनुषंगानें बदलून नव्याने तयार झालेले आहेत. यादवांची शैली हाही या अनुभूतीचाच अपरिहार्य भाग आहे. ग्रामीण बोलीचा उपयोगही त्या अनुषंगानेच या कथांतून झाला आहे. येथे यादवांनी ग्रामीण बोली 'वापरलेली' नाही. त्या बोलीतच त्यांचे अनुभव आकार घेतात, भावना दृश्यरूप घेतात. त्यामुळे वातावरणनिर्मितीच्या प्रभावासाठी ग्रामीण बोलीचा वापर करणाऱ्या 'कसबी' लेखककारागिरांहून यादवांच्या या कथा एकदम वेगळ्या उठून दिसतात. एकजीव व्यक्तिमत्त्वाच्या वाटतात. माडगूळकर-मिरासदारांच्या कथांशी तुलना करण्याचा मोह झालाच तर असे म्हणावे लागेल, की माडगूळकरांच्या ग्रामीण कथा निरीक्षणाची, सहानुभूतीची (sympathy), सहृदयतेची बैठक लाभलेल्या आहेत; तर यादवांच्या या कथांना सहानुभूतीची (sympathy) समरूपतेची, आंतरिक सुसंवादाची बैठक आहे. दोन्हीतील साम्य (उत्कट जीवनदर्शन, अस्सल शब्दचित्र आणि वेधक कथाबोज वगैरे), 'ओझं', 'माघारी', 'इंजेन', यासारख्या कथांमध्ये दिसते; तर दोहोंतील भेद (अनुभूतींचा प्रतिभाविष्कार, हृत्स्पर्शित्व, निसर्गात वितळलेली अनुभूती वगैरे) 'मोट', 'सून', 'चटावलेला' वगैरे कथांतून स्पष्ट होते.

या सर्व संग्रहामध्ये 'कथा' ही कथा संपूर्ण वेगळीच आहे. एक अगदी तरल, अस्पष्ट, धूसर, बाह्यकक्षा परस्परांत वितळून गेलेली अशी अनुभूती या कथेत यादवांनी चितारली आहे. अतिशय हळवी मन:स्थिती आणि त्यावर भिन्न संदर्भाच्या एकत्रिकरणातून प्रासंगिक कणा लाभलेल्या अनुभूतीचे उमटलेले प्रभावी ठसे या कथेची आकृती तयार करतात. "डोळ्यांच्या आत स्वत:ला घालून घेतलं.....डोळे झाकले की असं घालून घेता येतं....." "मी एकटाच. त्वचा, रक्त, मांस, यांच्याही अगदी आत गेलेला. शेजारी फक्त अंथरून. भुईला चिकटून" ...... "मी माझ्यात पडलो आहे. स्वत:ला माझ्यात एसपैस अंथरलं आहे "...... "खोली उंच. मी अंथरलेलो. उंच खोली माझ्याकडे वरून खाली पालीसारखी बघितली." या सारख्या वाक्यांमधून या अनुभूतीचा वेगळेपणा, हळवेपणा आणि तिची तीव्रता यांच्या कक्षा कोरलेल्या आहेत. आकलनाच्या दृष्टीने ही कथा पसरट नसली तरी परिणामाच्या दृष्टीने तीक्ष्ण आहे. असे असले तरी या संग्रहातील बाकीच्या कथांच्या समवाय आकृतीला मात्र ही कथा निश्चितच खटकते. उपरी वाटते.

○

**'खळाळ' – आनंद यादव : किंमत–सव्वासहा रुपये**

**मौज प्रकाशन**

# व्होल्गा जेव्हा लाल होते

वि. स. वाळिंबे

# १२

१९२१ च्या अखेरीपासून लेनिनची प्रकृती बिघडू लागली.

कचेरीत काम करीत असताना मध्येच त्याचे डोके इतके दुखू लागे की त्याला काहीही सुचत नसे. दोन्ही हातांनी डोके घट्ट धरून तो किती तरी वेळ नि:स्तब्ध बसून राही. त्यातच त्याला निद्रानाशाचा विकार जडला. आपल्याला घेरी येत आहे असे त्याला वाटे आणि मग आपण खाली कोसळू नये म्हणून तो जवळच्या एखाद्या खांबाला वा दरवाज्याला धरून उभा राही. लेनिनच्या शरीरातील पहिला जोर कोठल्या कोठे मावळला होता. डॉक्टर म्हणायचे, 'आजाराचे स्वरूप तसं काही गंभीर नाही. कामाच्या ताणामुळे हा त्रास होत आहे.'

परंतु डॉक्टरांच्या या समजावणीवर लेनिनचा विश्वास बसणे कठीण होते. आपली शक्ती ओसरत चालली आहे हे त्याला जाणवत होते. म्हणून तो डॉक्टरांना म्हणायचा, 'तुम्ही काहीही सांगा, पण मला माहीत आहे की माझा मृत्यू आता जवळ आलेला आहे. त्याच्या आगमनाची पहिली चाहूल मला जाणवू लागली आहे.'

सहकारी समजूत घालू लागले की लेनिन म्हणायचा, 'पक्षघाताचा विकार माझा बळी घेणार आहे हे मला पक्कं माहीत आहे.'

त्याने आता वैद्यकीय पुस्तकांचे वाचन सुरू केले होते. पक्षघाताची पहिली लक्षण कोणती असतात याची तो माहिती मिळवू लागला.

१९२१ च्या डिसेंबरमध्ये लेनिन विश्रांतीसाठी गोर्की खेड्यात राहावयास गेला.

जाताना त्याने आपल्या सहकाऱ्यांसाठी एक पत्र लिहून ठेवले होते. त्यात तो म्हणतो, 'गेल्या काही दिवसांपासून मी माझं काम कमी केलं असलं आणि विश्रांती घेत असलो तरीदेखील निद्रानाशाचा विकार बराच बळवला आहे. मार्चमध्ये भरणाऱ्या पक्ष-परिषदेला मी हजर राहू शकेन की नाही यासंबंधी मला आजच सांगता येणं कठीण आहे.'

**१६ डिसेंबरला लेनिनला अर्धांगवायूचा दुसरा झटका आला. शरीराची उजवी बाजू लुळी पडू लागली. अहोरात्र डॉक्टरी उपचार सुरू झाले. लेनिनला या आजाराचा अंदाज आला. पण तरीही या ढासळत्या प्रकृतीविरुद्ध झुंज देण्याचा त्याने निर्धार केला.......**

गोर्की येथील वास्तव्यातही लेनिनचे राज्यकारभाराकडे सतत लक्ष असे. युरोप आणि अमेरिका यांच्याशी आपला व्यापार वाढावा म्हणून आपण आपल्या घटने-मध्ये काही बदल करावेत असे परराष्ट्र मंत्री चिचेरिन याने सुचविताच लेनिनने रागाने उत्तर दिले–'मला वाटतं चिचेरिनचं डोकं तपासून घेण्यासाठी त्याला रुग्णा-लयात धाडावं. या बाबतीत कोणतीच हयगय होता कामा नये.'

कम्युनिस्ट पक्षाची अकरावी वार्षिक परिषद १९२२ च्या मार्चमध्ये भरली. प्रकृती बरी नसतानाही लेनिन या परिषदेला हजर राहिला. आपल्या भाषणात त्याने नेहमीप्रमाणे मेन्शेव्हिकांवर जोरदार हल्ला चढविला. लेनिन म्हणाला, 'मेन्शेव्हिक म्हणतात की नोव्हेंबर क्रांतीने अनन्वित अत्याचार केले आहेत. ही असली भाषा बोलणाऱ्यांना आपल्या क्रांतिकारी न्यायालयाने देहान्ताची शिक्षा फर्मावली पाहिजे.'

वर्षापूर्वी लेनिनने नवे आर्थिक धोरण जाहीर करून खाजगी व्यापारावरील निर्बंध उठविले होते. या बाबतही आपण कडक धोरण स्वीकारले पाहिजे असे लेनिनने या परिषदेत सुचविले. तो म्हणाला, 'गेलं वर्षभर आपण बरंच नरमाईचं धोरण स्वीकारलं. परंतु ही असली नरमाई आता बस्स झाली असं मला वाटतं. कारण आपण ज्या कारणासाठी हे सौम्य धोरण स्वीकारलं होतं ते उद्दिष्ट साध्य झालेलं नाही. म्हणून आपण पुन्हा खाजगी व्यापारावर कडक नियंत्रणे जारी करणं आवश्यक आहे. इतर कोणाचीही पर्वा न करता आपण आपली शक्ती केंद्रित केली पाहिजे.'

कम्युनिस्ट नोकरशाही कार्यक्षम ठरलेली नाही हे पाहून लेनिनच्या संतापाचा पारा चढला होता. कम्युनिस्ट नोकरशाहीला उद्देशून तो म्हणाला, 'भांडवलदार अतोनात फायदा मिळवितात आणि लोकांची पिळवणूक करतात असं आपण म्हणतो, पण त्यांना त्यांचे काम नीट माहीत आहे. तुम्ही सांगता की आम्ही नवी अर्थरचना उभारत आहोत, आम्ही नफेबाजी करीत नाही. ठीक आहे. तुम्ही फार पवित्र कार्य करीत आहात; तुमच्यासाठी स्वर्गाची दारं खुली होतील हे मान्य करूनही मला तुम्हांला असं विचारायचं आहे की तुम्हांला तुमच्या कामाची नीट माहिती आहे का?'

लेनिनच्या या भाषणानंतर अकराव्या पक्ष–परिषदेने जे निर्णय केले त्यांचा रशियाच्या भवितव्यावर दीर्घकालीन परिणाम होणार होता. राजकीय प्रतिस्पर्ध्यांबद्दल दयामाया दाखवायची नाही, देशात सतत दहशतवादी वातावरण कायम राखायचे, नव्या आर्थिक धोरणाला तिलांजली द्यायची आणि मांडवलशाही जगाविरुद्ध झुंज घेण्यासाठी सिद्धता करायची हे लेनिनचे सर्व सिद्धान्त पक्ष–परिषदेने बिनतक्रार मान्य केले.

कम्युनिस्ट शासन यंत्रणा अद्याप कार्यक्षम झाली नाही म्हणून लेनिनने या भाषणात आपल्या सहकाऱ्यांवर व अनुयायांवर कडक टीका केली असली तरीदेखील आपण जे काही साध्य केले आहे त्याला ऐतिहासिक महत्त्व आहे हेही त्याला ठाऊक होते. आपल्या समारोपाच्या भाषणात तो म्हणाला, ' जगातलं पहिलं समाजवादी सरकार आपण स्थापन केलेलं आहे. आपली राज्ययंत्रणा चांगली नाही ही गोष्ट खरी आहे. परंतु शास्त्रज्ञांनी जेव्हा वाफेवर चालणारं पहिलं इंजिन तयार केलं तेव्हा तेही मुळीच चांगलं नव्हतं हे विसरून चालणार नाही. आज आमची राज्ययंत्रणा आमच्या अपेक्षेप्रमाणे काम करीत नाही ही गोष्ट मान्य करूनही ही राज्ययंत्रणा अस्तित्वात आहे ही वस्तुस्थिती कमी महत्त्वाची नाही. समाजवादी सरकार प्रस्थापित करून आपण सर्वात मोठं ऐतिहासिक कार्य पार पाडलेलं आहे. '

२ एप्रिल रोजी या परिषदेचे कामकाज संपले आणि दुसऱ्या दिवशी पक्षाचा सरचिटणीस म्हणून जोसेफ स्टॅलिनची नेमणूक जाहीर करण्यात आली.

रशियाच्या दृष्टीने ही महत्त्वपूर्ण घटना ठरणार होती.

स्टॅलिनची सरचिटणीसपदावर नेमणूक झाली त्या वेळी तो फारसा प्रसिद्ध नव्हता. कम्युनिस्ट पक्षाच्या वरिष्ठ वर्तुळातही त्याचा त्या वेळी समावेश झालेला नव्हता. आणि तरीही लेनिनने सरचिटणीसपदावर स्टॅलिनची नियुक्ती केली. अतिशय कष्टाळू आणि कार्यक्षम संघटक म्हणून स्टॅलिन लेनिनच्या डोळ्यात भरला होता. आणि या गुणावर लुब्ध होऊनच लेनिनने त्याच्याकडे पक्षाची सूत्रे सोपविली.

स्टॅलिन हा जसा संघटनाकुशल आहे तसाच जबर महत्त्वाकांक्षीही आहे हे त्या वेळी लेलिनला ठाऊक नसावे. स्टॅलिनला मात्र आपल्यापुढचा मार्ग स्पष्ट दिसत होता. लवकरच सुरू होणाऱ्या सत्तास्पर्धेमध्ये लेनिनचे सहकारी आपले शत्रू ठरणार आहेत हे त्याला पक्के ठाऊक होते. आणि आपल्या प्रतिस्पर्ध्यांचे निर्दालन कसे करायचे असते हे तो लेनिनकडूनच शिकला होता. परंतु सरचिटणीसपदावर स्टॅलिनची नेमणूक करताना त्याचे हे मनोगत कोणालाच कळले नव्हते.

पक्ष परिषद आटोपताच लेनिन विश्रांतीसाठी गोर्कीला परतला. परिषदेच्या कामकाजात भाग घेताना त्याच्या शरीरावर आणि मनावर खूपच ताण पडला आणि त्यामुळे त्याची प्रकृती अधिक बिघडली. डोकेदुखीमुळे त्याला काहीही सुचेनासे झाले.

आणि काही दिवस तरी आपल्याला राज्यकारभाराकडे लक्ष देता येणार नाही हे ओळखून उपप्रधानमंत्री म्हणून आपल्या गैरहजेरीत ट्रॉटस्कीने राज्यकारभाराची धुरा स्वीकारावी असे लेनिनने कळविले. ट्रॉटस्की हाच आपला राजकीय वारस आहे हेच लेनिनला सूचित करायचे होते.

परंतु लेनिनची ही सूचना ट्रॉटस्कीने फेटाळून लावली. वारसापद लढून मिळवायचे असते, देणगी म्हणून त्याचा स्वीकार करायचा नसतो अशी या मनस्वी प्रवृत्तीच्या ट्रॉटस्कीची धारणा होती. आपल्या एककल्ली स्वभावामुळे आपण या पदाला पात्र नाही हे जसे त्याला ठाऊक होते तसेच मंत्रिमंडळातील इतर सहकाऱ्यांपैकी कोणीही त्या पदाला लायक नाही असे तो मानत होता. आपण ज्यू आहोत ही गोष्टही ट्रॉटस्की कधी विसरू शकला नाही. कम्युनिस्ट पक्षाच्या केंद्रीय कार्यकारिणीत ज्यू-सदस्यांचे बहुमत असले तरी येथील ज्यू समाज रशियन जनतेशी समरस झालेला नाही हेही त्याला ठाऊक होते. रशियाचे नेतृत्व एखाद्या ज्यू माणसाकडे जाता कामा नये असे मानणारा ट्रॉटस्की ते पद स्टॅलिनसारख्या जॉर्जियन माणसाकडेही जाता कामा नये याबद्दल तितकाच आग्रही होता. आपल्या बुद्धिवैभवाबद्दल ट्रॉटस्कीला खचित गर्व होता. परंतु केवळ बुद्धिवैभवाच्या बळावर राज्ययंत्रणेची धुरा सांभाळणे शक्य होणार नाही याचेही त्याला भान होते. बुद्धिवैभव आणि संघटनाचातुर्य या दोन्ही गुणांचा लेनिनमध्ये जसा संगम झालेला आहे तशा एखाद्या व्यक्तीने लेनिनच्या पश्चात रशियाच्या प्रधानमंत्रीपदावर विराजमान व्हावे असे ट्रॉटस्कीला वाटत होते आणि म्हणूनच त्याने उपप्रधानमंत्रीपद स्वीकारण्याची लेनिनची सूचना फेटाळून लावली.

आपला हा विचार अखेरीस आपल्या राजकीय मृत्यूला कारणीभूत होणार आहे हे त्या वेळी ट्रॉटस्कीला ठाऊक नव्हते.

लेनिनची डोकेदुखी विकोपाला गेली तेव्हा एका नामवंत जर्मन डॉक्टरला बोलावण्यात आले. मध्यंतरी जो लेनिनच्या खुनाचा प्रयत्न झाला होता त्या वेळच्या दोन गोळ्या अद्यापही त्याच्या शरीरात होत्या. या गोळ्यांमुळेच त्याच्या रक्तात विषारी द्रव्ये निर्माण होत असून त्यातून हा आजार उद्भवला आहे असे त्या जर्मन डॉक्टरचे मत पडले. त्यानंतर डॉ. रोझानोव्ह यांनीही लेनिनची प्रकृती तपासली. परंतु त्यांचे मत नेमके जर्मन डॉक्टरच्या उलट पडले. पिस्तुलातील शिशाच्या गोळ्यांमुळे रक्तात विषारी द्रव्य तयार होत असले तरी त्यामुळे डोकेदुखीचा विकार बळावण्याचे काहीच कारण नाही असे डॉ. रोझानोव्ह यांनी सांगितले. जी गोळी लेनिनच्या मानेत घुसली आहे ती विनासायास काढता येईल असेही रोझानोव्ह म्हणाले. लेनिन उत्तरला, ' ठीक आहे. मानेत घुसलेली गोळी काढून टाका. म्हणजे मग मलाही बरं वाटेल आणि लोकांची शंकाही दूर होईल. '

त्यानंतर लेनिनच्या मानेचे क्ष–किरणानी छायाचित्र घेण्यात आले व मानेत

गोळी नेमकी कोठे घुसली आहे हे निश्चित करण्यात आले. २३ एप्रिल रोजी लेनिनच्या मानेवर शस्त्रक्रिया करण्यात आली. त्या वेळी त्याला भूल देण्यात आली होती. शस्त्रक्रियेनंतर डॉक्टरांशी बोलताना लेनिन म्हणाला, ' ही शस्त्रक्रिया मी–देखील करू शकलो असतो. मानेजवळचा थोडासा भाग कापला असता तर गोळी आपोआप बाहेर पडली असती. त्यासाठी एवढा जामानिमा करण्याची काहीच जरुरी नव्हती. '

लेनिनचे हे उत्तर ऐकून डॉक्टर हसले. स्वत: लेनिन एक उत्कृष्ट ' शस्त्रक्रिया-विशारद ' आहे हे सर्वांना माहीत होते.

या काळात क्रुपस्कायाची प्रकृतीही तितकीशी ठीक नव्हती. म्हणून तिचीही प्रकृती तपासावी असे लेनिनने डॉ. रोझानोव्ह यांना सुचविले. लेनिन म्हणाला, ' ती आजारी असली तरीदेखील आपली प्रकृती चांगली आहे असा बहाणा करते. माझ्या आजारपणामुळे ती आपल्या प्रकृतीची उपेक्षा करीत आहे. '

' तुम्हीही तसेच वागता, ' रोझानोव्ह म्हणाले.

हसत हसत लेनिन म्हणाला, ' डॉक्टर मला प्रकृतीचं फार कौतुक करून चालणार नाही. खूप कामं शिल्लक आहेत. '

शस्त्रक्रियेसाठी एक आठवडा क्रेमलिनमध्ये राहिल्यानंतर लेनिन गोर्कीला परतला.

सोव्हिएट रशियाची विधिसंहिता तयार करण्याचे काम अद्याप बाकी होते. गोर्की येथे विश्रांती घेत असताना लेनिनने या कामाला हात घातला. मेन्शेव्हिक आणि सोशॅलिस्ट रेव्होल्यूशनरी यांना देहान्त शासन करण्याची विधिसंहितेत तरतूद केल्याशिवाय लेनिनला चैन पडणार नव्हते. न्यायमंत्री कर्स्की याच्याशी बोलताना लेनिन म्हणाला, ' कम्युनिस्ट राजवटीला विरोध करणाऱ्यांना फाशी देण्याची, तुरुंगात टाकण्याची वा देशाबाहेर हद्दपार करण्याची तरतूद करणारा कायदा लवकर करावयास हवा. त्याशिवाय आपल्याला आपली ही राजवट स्थिर आणि सुरक्षित करता येणार नाही. कम्युनिस्ट रशियाची स्वतंत्र अशी विधिसंहिता लवकरच तयार केली पाहिजे. '

लेनिनला अभिप्रेत असलेल्या या कायद्याचा स्टॅलिनने मनमुराद वापर केला. आपल्या सत्तास्पर्धेत लेनिनला जे जे सहकारी उपद्रवकारक ठरतील असे त्याला वाटले त्या सर्वांचा विनाश घडवून आणण्यासाठी स्टॅलिनने लेनिनच्या विधिसंहितेतील कलमांचा मुख्य आधार घेतला होता.

२६ मे रोजी सकाळी दहा वाजता डॉ. रोझानोव्ह यांच्या दवाखान्यातील टेलिफोन खणखणला. लेनिनची बहिण मारिआ गोर्कीहून डॉक्टरांना सांगत होती, ' डॉक्टर, ताबडतोब इकडे या. व्लादिमिरच्या पोटात दुखायला लागले असून त्याला वांत्या होत आहेत.'

लेनिनसारख्या सत्ताधीशाला तपासायला जाताना एकटयानेच जाणे इष्ट नव्हे हे जाणण्याइतके डॉ. रोझानोव्ह चतुर होते. त्यांनी आपल्याबरोबर आणखी सात-आठ डॉक्टर घेतले. लेनिनने आदल्या दिवशी मासे खाल्ले होते आणि ते बहुधा शिळे असल्यामुळे त्याला वांत्या होत असाव्यात असा डॉक्टरांचा अभिप्राय पडला. परंतु जेव्हा लेनिनचे बोलणे अडखळल्यासारखे येऊ लागले तेव्हा डॉक्टरांना निराळीच शंका येऊ लागली. तरीही एवढया मोठया नेत्याच्या आजारासंबंधीचा आपला अंदाज आताच सांगून टाकणे डॉ. रोझानोव्ह यांना प्रशस्त वाटले नाही. लेनिनने आता संपूर्ण विश्रांती घेतली पाहिजे आणि त्याला कोणीही भेटता कामा नये असे सांगून डॉक्टर मंडळी मॉस्कोला परतली.

लेनिनला पक्षघाताचा झटका आलेला होता.

हा पहिला झटका तीन आठवडयांनंतर ओसरला. आता आपण चांगले बरे झालो असून आता आपल्याला काम करण्याची डॉक्टरांनी परवानगी दिली पाहिजे असे लेनिन सांगू लागला. परंतु तशी परवानगी देणे डॉक्टरांना शक्यच नव्हते. 'मला कोणता आजार झाला आहे हे तरी सांगा,' असे लेनिन सारखे विचारू लागला. या प्रश्नालाही डॉक्टरांनी उडवाउडवीची उत्तरे दिली.

लेनिनचे डोके दुखू लागले तेव्हा त्याने डॉ. मिखाईल ऑरबॉख यांना बोलावून घेऊन विचारले, 'एक स्पष्टवक्ते डॉक्टर म्हणून तुमचा लौकिक आहे. म्हणून तुम्ही माझ्या प्रश्नाला खरं तेच उत्तर दिलं पाहिजे. मला पक्षघात झाला आहे काय आणि दिवसेंदिवस तो वाढत चालला आहे काय?' एवढे बोलून लेनिनच्या आवाजात बदल झाला. अतिशय व्याकुळ होऊन तो डॉ. ऑरबॉख यांना म्हणाला, 'मला जर अर्धांगवायू झाला असेल तर मग सारंच काही संपलं म्हणून समजा. कारण, अशा दुबळया अवस्थेत जिवंत राहून माझा कोणास काय उपयोग होणार?'

एवढयात परिचारिका तेथे आली आणि हे बोलणे तेवढयावरच संपले. डॉ. ऑरबॉख यांनी एक दीर्घ निःश्वास टाकला.

लेनिन आपल्या आयुष्यात प्रथमच दयेची याचना करीत होता.

महिन्या दीड महिन्याच्या आतच लेनिनने डॉक्टरांचा सल्ला धुडकावून देऊन लेखन–वाचनास प्रारंभ केला. क्रेमलिनमधल्या ग्रंथालयातून पुस्तके मागवून तो त्यातील टिपणे काढू लागला. कोणाशीही चर्चा न करण्याची डॉक्टरांची सूचनाही तो आता मानीनासा झाला होता. लेनिन आपले सर्वस्वी ऐकणार नाही हे डॉक्टरांनाही माहीत होते. म्हणून त्यांनी सांगितले, 'निदान वृत्तपत्रे तरी वाचू नका. कारण त्यामुळे नकळत तुम्ही सध्या घडत असलेल्या घटनांचा विचार करू लागाल आणि त्याचा मेंदूवर बराच ताण पडेल.'

एकदा स्टॅलिन भेटावयास गेलेला असताना लेनिन त्याला म्हणाला, 'हे डॉक्टर लोक मला वृत्तपत्रंदेखील वाचू देत नाहीत. राजकारणाची चर्चा करायची नाही

असं माझ्यावर बंधन आहे. डॉक्टरांचे हे दोन्ही हुकूम कटाक्षान पाळायचे असं मी ठरविलं आहे.'

त्यावर स्टॅलिन मोठ्याने हसला. कारण स्टॅलिन तेथे आल्यापासून त्या दोघांत प्रचलित परिस्थितीवरच चर्चा सुरू होती. या भेटीनंतर एक महिन्याने स्टॅलिन पुन्हा गोर्कीला आला. पूर्वीपेक्षा लेनिनच्या प्रकृतीत आता बरीच सुधारणा झाली आहे हे त्याला जाणवले.

१९१७ मध्ये बोल्शेव्हिक क्रांती झाल्यापासून या वर्षीच रशियात चांगले पीक आलेले होते. त्यासंबंधी त्या दोघांच्या गप्पा सुरू झाल्या. लेनिन म्हणाला, ' आपला कसोटीचा काळ आता संपला आहे. पीक चांगलं आलं असल्यामुळे लोकांचा आपल्या-विरुद्धचा असंतोष आपोआपच कमी होईल. साहजिकच औद्योगिक उत्पादन वाढून आर्थिक परिस्थिती सुधारेल. ज्या गोष्टी निरुपयोगी आहेत त्यांचा नाश करून टाकणे हेच आपलं आज मुख्य काम आहे. आपण आपल्या प्रशासकीय खर्चात काट-कसर केली पाहिजे. शिवाय सरकारी खात्यांची कार्यक्षमताही वाढविली पाहिजे. आपण चांगला कारभार करू शकतो अशी जर लोकांची एकदा खात्री पटली तर आपल्याला कशाचीच काळजी करावी लागणार नाही.'

बोलण्याच्या ओघात भांडवलशाही राष्ट्रांचा विषय निघाला. लेनिन सांगू लागला ' हे सारे भांडवलशाही देश कमालीचे स्वार्थी असून मनातून परस्परांचा द्वेषच करीत असतात. एक दिवस ते एकमेकांच्या डोक्यावर बसतील याबद्दल मला मुळीच शंका नाही. ते आपल्याला दडपून टाकण्याचा खूप प्रयत्न करतील. पण त्यात त्यांना यश येणार नाही. आपलं धोरण ठरलेल आहे. आज आपल्याला कोणाशीच वैर करावयाचे नाही. पण म्हणून त्यांचं ऐकायचं असंही नाही. आपण आपल्या राज्य-यंत्रणेवर एवढी पकड ठेवली पाहिजे की इतरांना त्यात मुळीच हस्तक्षेप करता येणार नाही. मेन्शेव्हिक आणि सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी यांच्या बाबतीतही आपलं धोरण कणखर असले पाहिजे. आपली बदनामी करण्याचे त्यांनी व्रतच घेतलेलं आहे. पण भांडवलशाही राष्ट्रांप्रमाणे हे लोकही खड्ड्यात पडल्याशिवाय राहणार नाहीत.'

स्टॅलिन म्हणाला, ' तुमची प्रकृती ढासळत चालली असल्याच्या बातम्या परदेशी वृत्तपत्रांत ठळक रीतीने छापून येत आहेत.'

लेनिन उत्तरला, ' त्यांना जितकं खोटं छापायचं असेल तितकं छापू द्या, त्यांचं समाधान आपण कशाला हिरावून घ्यायचं ? ज्या लोकांचा विनाश ठरलेला आहे त्यांचं उरलंसुरलं समाधान नाहीसं करण्यात काय पुरुषार्थ आहे ?'

अर्धांगवायूने रुग्णशय्येला खिळल्यानंतरही लेनिनच्या स्वभावातील ताठरपणा किंचितही कमी झाला नव्हता.

आपली प्रकृती सुधारत चालली आहे अशी रशियन नागरिकांची खात्री पटावी यासाठी लेनिनने सप्टेंबरमध्ये गोर्की येथे एका छायाचित्रकाराला बोलावून आपली निरनिराळी वीस छायाचित्रे काढून घेतली. गोर्की येथे लेनिन नित्याचे कामकाज पाहत आहे, वाचत आहे, जवळच्या जंगलात फिरावयास गेला आहे अशी ही निरनिराळ्या प्रसंगांची छायाचित्रे 'प्रावदा' आणि 'इझवेस्तिया' या पत्रांत ठळक रीतीने प्रसिद्ध करण्यात आली होती.

सप्टेंबरच्या अखेरीला लेनिनच्या प्रकृतीत खरोखरच सुधारणा झाली होती. अद्यापही त्याचे बोलणे स्पष्ट येत नव्हते. उजवे अंग काहीसे अशक्तच होते. तरीदेखील चार महिन्यांच्या विश्रांतीनंतर आता तो क्रेमलिनमध्ये जाऊन थोडेसे कामकाज पाहू शकेल असे डॉक्टरांचे मत पडले. लेनिन डॉक्टरांच्या या शब्दाचीच वाट पाहात होता. लेनिनने दररोज पाच तासांपेक्षा अधिक वेळ काम करता कामा नये आणि त्याने शनिवारी व रविवारी संपूर्ण विश्रांती घेतली पाहिजे अशा त्याच्यावर डॉक्टरांनी अटी घातल्या. परंतु लेनिन असल्या अटींना मुळीच भीक घालणार नव्हता.

२ ऑक्टोबर १९२२ रोजी तो मॉस्कोला परतला. आदल्या दिवशी त्याने क्रेमलिनमधल्या आपल्या सहकाऱ्यांना पत्र लिहून कळविले होते– 'मी उद्या तेथे येत आहे. गेल्या चार महिन्यांतल्या कामकाजाचे सर्व कागदपत्र माझ्या खोलीत आणून ठेवा.'

क्रेमलिनमध्ये परतल्यानंतर लेनिन आपले आजारीपण साफ विसरून गेला होता. दिवसाचे दहा–दहा तास तो काम करू लागला. एकदा तो बराच वेळ कचेरीत बसलेला असताना डॉ. रोझानोव्ह तेथे आले. त्यांना पाहताच लेनिन म्हणाला, 'मी काम करीत नाही हं. नुसते वाचत बसलो आहे.'

३१ ऑक्टोबर रोजी सोव्हिएटच्या केंद्रीय कार्यकारिणीच्या बैठकीला लेनिन हजर राहिला. लेनिनने सभागृहात प्रवेश करताच तेथे जमलेल्या तीनशे प्रतिनिधींनी टाळ्यांचा गजर करून त्याचे स्वागत केले. लेनिनने हात उंचावून या स्वागताचा स्वीकार केला. डॉक्टरांनी त्याला केवळ पंधरा मिनिटे भाषण करायची परवानगी दिली होती. त्याप्रमाणे त्याने केवळ पंधरा मिनिटांत आपले भाषण संपविले.

या बैठकीनंतर छायाचित्रे घेण्याचा कार्यक्रम झाला. त्या वेळी मॉस्कोतील अमेरिकन वार्ताहरही तेथे आले होते. न्यूयॉर्कमधल्या एका पत्राचा चित्रकारही त्या वेळी मॉस्कोला आलेला होता. लेनिन वार्ताहरांशी गप्पा मारीत आहे हे पाहून त्या चित्रकाराने लेनिनचे रेखाचित्र काढण्यास सुरुवात केली. तो लेनिनला म्हणाला, 'तुम्ही महापुरुष आहात असं सारं जग म्हणतं.' लेनिन उत्तरला, 'माझ्या शरीराकडे पाहिल्यानंतर मी महापुरुष नाही याबद्दल तुझी खात्री पटलेली असेल!'

दोन आठवड्यानंतर याच ठिकाणी थर्ड इंटरनॅशनलची परिषद भरली. या वेळी लेनिनला एक तासभर बोलण्याची डॉक्टरांनी परवानगी दिली होती. या वेळी

लेनिनने जर्मन भाषेत भाषण केले. भाषणाचा विषय होता–'रशियन राज्यक्रांतीची पाच वर्षे आणि जागतिक क्रांतीचे भवितव्य.' परंतु या भाषणात लेनिन जागतिक क्रांतीसंबंधी फारच थोडे बोलला. आश्चर्याची गोष्ट अशी की रशियन राज्यक्रांतीसंबंधीही लेनिनने या भाषणात एक महत्त्वाची कबुली दिली. बोल्शेव्हिझम रशियन जनतेला मान्य होता म्हणून ही क्रांती घडू शकली हे विधान खरे नसल्याचे लेनिनने सांगताच श्रोत्यांना आश्चर्याचा धक्का बसला. बोल्शेव्हिझमला विरोध करणाऱ्या शक्ती संघटित नव्हत्या म्हणूनच आपण हा विजय संपादन करू शकलो हे लेनिनने मान्य केले. तो म्हणाला, 'क्रांती करू इच्छिणाऱ्यांच्या आयुष्यात असे काही क्षण येतात की त्या वेळी त्यांचा शत्रू आपण होऊन निष्प्रभ झालेला असतो. अशा क्षणी जर क्रांतिकारकांनी उठाव करण्याचे धैर्य दाखविले तर यश त्यांना सामोरे येते. रशियन राज्यक्रांतीबद्दलही नेमकं असंच घडलं.'

आपल्याला सरकारी भांडवलशाहीचा का पुरस्कार करावा लागला याचा खुलासा करताना समाजवादाच्या मूलभूत कल्पनेशी ती विसंगत आहे हेही लेनिनने मान्य केले. १९२१ पासून रशियात शांतता प्रस्थापित झाल्याबद्दल आपल्याला अतीव समाधान होत आहे हे सांगताना त्याने दोन लाख शेतकऱ्यांचे हत्याकांड करणाऱ्या तांबोव्ह प्रांतातील उठावाचा उल्लेख मात्र कटाक्षाने टाळला. आपल्या भाषणाच्या अखेरीस तो म्हणाला, 'आमच्या हातून किती घोडचुका झाल्या आहेत हे माझ्याइतकं दुसऱ्या कोणालाच माहीत नाही. परंतु चुका कोणाच्या हातून होत नाहीत ?' लेनिननंतर ट्रॉटस्कीचे भाषण झाले. तो साडेसात तास बोलत होता. रशियन, जर्मन आणि फ्रेंच अशा तीनही भाषांत तो आपले विचार अस्खलितपणे व्यक्त करीत होता.

या परिषदेनंतर एक आठवड्याने मॉस्को सोव्हिएटची बैठक भरली. प्रकृती बरी नसल्यामुळे लेनिन या बैठकीत फारच थोडा वेळ बोलला. या भाषणात त्याचा नेहमीचा अंगार दिसून आला नाही. लेनिनचे हे शेवटचेच जाहीर भाषण ठरले.

लेनिन म्हणाला, 'प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे मला आता पूर्वीसारखं काम करणं शक्य होणार नाही. म्हणून माझी कामं रिकोव्ह, त्सिडरूच आणि कामेनेव्ह यांनी पाहावीत अशी माझी इच्छा आहे.' यानंतर नेहमीप्रमाणे या वेळी त्याच्या तोंडून भांडवलशाहीवर हल्ला करणारी भाषा बाहेर पडली नाही. उलटपक्षी स्वप्नरंजनाचा काळ संपलेला आहे असे त्याने आपल्या अनुयायांना बजावले. भांडवलशाहीतील चांगले गुण आपण आत्मसात करायला हवेत हेही त्याने आवर्जून सांगितले. तो म्हणाला, 'मी माझं आयुष्य ध्येयपूर्तीसाठी खर्ची घालायला तयार आहे असं आपण पूर्वी म्हणत होतो. आयुष्य खर्ची घालण्याची भाषा बोलणं सोपं असलं तरी ही कृती तितकीशी सोपी नाही. आता तर परिस्थिती खूपच बदलली आहे. आता आपण सर्व गोष्टींचा साधकबाधक विचार करून आपलं

धोरणं आखलं पाहिजे. भांडवलशाही राष्ट्रांकडून आपल्या वरंच शिकण्यासारखं आहे. ही राष्ट्रं आपल्यावर मेहेरबानी करणार नाहीत ही गोष्ट खरी असली तरी त्यांच्यापासून आपण आपला अधिकाधिक फायदा करून घेण्यासाठी झटलं पाहिजे. मी सांगतो हे काम तितकसं सोपं नाही याची मला जाणीव आहे. पण बदलत्या परिस्थितीची पावलं ओळखण्याइतकं चातुर्य आपल्यापाशी अवश्य असायला हवं.'

अशा रीतीने लेनिनने आपल्या अखेरच्या भाषणात समाजवादी देश आणि भांडवलशाही देश यांच्यांतील सहजीवनाचा पुरस्कार केला. मात्र त्यासाठी समाजवादी राष्ट्राने आपल्या ध्येयधोरणात बदल करण्याचे कारण नाही, हेही त्याने तितक्याच आग्रहाने सांगितले. जगात लवकरच समाजवाद अवतरेल याबद्दल आपल्याला शंका नसल्याचा विश्वास व्यक्त करून लेनिनने आपल्या भाषणाचा समारोप केला.

या परिषदांचा व भाषणांचा ताण सहन करण्याइतकी लेनिनच्या शरीरात ताकद राहिली नव्हती. त्यामुळे मॉस्को सोव्हिएटपुढील भाषणानंतर पाच दिवसांच्या आतच त्याला आठवडाभर संपूर्ण विश्रांती घ्यावी लागली. त्यानंतर मात्र लेनिन काही दिवस क्रेमलिनमध्ये व काही दिवस गोर्की येथे राहू लागला.

१३ डिसेंबरपासून त्याला पुन्हा वात्यांचा त्रास होऊ लागला. गोर्की येथे विश्रांतीसाठी जाण्यापूर्वी दोन दिवस त्याने अहोरात्र काम करून आपल्या टेबलावरच्या साऱ्या कागदपत्रांचा निचरा केला. या काळात निद्रानाश व डोकेदुखी या विकारांनीही उचल खाल्ली. १६ डिसेंबरला लेनिनला अर्धांगवायूचा दुसरा झटका आला. हा झटका केव्हातरी येणारच हे डॉक्टरांना माहीत होते. तो लवकर येऊ नये म्हणून लेनिनने विश्रांती घ्यावी असे ते सारखे सांगत होते. परंतु प्रकृतीत किंचित सुधारणा होताच लेनिन कामकाजाला प्रारंभ करी आणि त्यामुळेच हा दुसरा झटका आल्यानंतर लेनिनने आता संपूर्ण विश्रांती घेतली पाहिजे असे डॉक्टरांनी त्याला निग्रहाने सांगितले. डॉक्टरांचा हा सल्ला मानल्याशिवाय आपल्याला आता गत्यंतर नाही हे त्याला कळून चुकले.

लेनिनच्या शरीराची उजवी बाजू लुळी पडत चालली होती. अहोरात्र डॉक्टरी उपचार सुरू होते. आता आपण पुन्हा खडखडीत बरे होणार नाही याचा लेनिनला अंदाज आला होता.

आणि तरीही आपल्या ढासळत्या शरीरप्रकृतीविरुद्ध शेवटपर्यंत झुंज घेण्याचा त्याच्या मनाने निर्धार केला होता.

[ क्रमशः ]

"प्रथम पाच लाख डमी सोल्जर्स जर्मनीत उतरतील. त्यांच्यावरील हल्ल्यात जर्मनांचा दारूगोळा संपेल. त्यांचा पराभव केल्याबद्दल रोमेलचा सत्कार होईल आणि या गडबडीत खऱ्या इंग्लिश फौजा जर्मनीत उतरून विजय मिळवितील." माँटीच्या थाटात जेम्स भराभर हुकूम सोडू लागला. . . .

# ४

अनुवाद

अनंत भावे

स्कॉटलंडला जाण्यासाठी जॅक हेरवे आणि जेम्सने गाडी पकडली. हेरवे अधिकारी असल्यामुळे तो पहिल्या वर्गात बसला तर सार्जंट जेम्सला तिसऱ्या वर्गाने प्रवास करावा लागला. तिसऱ्या वर्गाचा डबा प्रवाशांनी ठेचून भरला होता. मात्र पुढे प्रत्येक स्टेशनवर गर्दी कमी कमी होत गेली. शेवटी एक खलाशी तेवढा जेम्सच्या सोबतीला उरला. जेम्स आणि तो खलाशी साहजिकच युद्धाबद्दल बोलू लागले. बोलता बोलता तो खलाशी डी-दिनाच्या आरमारी हालचालींचे तपशीलवार वर्णन करू लागला.

जेम्स आश्चर्याने स्तंभित झाला. त्या खलाश्याला आवरण्याचा प्रयत्न करू लागला. त्या खलाश्याने, जेम्सला न जुमानता आपले कथन चालूच ठेवले. गुप्ततेचे सारे संकेत वाऱ्यावर सोडून आगगाडीसारख्या सार्वजनिक ठिकाणी तो



# मॉन्टीज डबल

खलाशी एका पुढील निर्णायक मोहिमेचा डांगोरा पिटत होता ! ही माहिती कळण्यासाठी जर्मनांनी काय वाटेल ते केले असते. आपण जर्मन गुप्तहेर असतो तर— असा एक गमतीदार पण भयानक विचार जेम्सच्या डोक्यात येऊन गेला.

पर्थ स्टेशनवर गाडी थांबली तेव्हा तो खलाशी उतरू लागला. जेम्सला राहवले नाही. एका अनोळखी माणसाशी असा वार्तालाप करण्यातला धोका जेम्स त्याला समजावून देऊ लागला तेव्हा तो खलाशी उत्तरला, " अहो, असं काय करता. तुम्ही गुप्तहेरखात्याची माणसं. तुम्हांला सगळ्या गोष्टी माहीत असतात. त्यामुळं असल्या गुप्त गोष्टी तुम्हाला नाही सांगायच्या तर काय चर्चिलला सांगू ?"

सकाळी गाडी इनव्हरनेस येथे थांबली. हेरवे आणि जेम्स खाली उतरले, तेथून पुढे त्यांना मोटारने जायचे होते. मोटारने जाताना दिसणाऱ्या स्कॉटलंडच्या अद्‌भुत निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेताना जेम्सला तिसऱ्या वर्गाच्या आदल्या रात्रीच्या भयंकर प्रवासाने आलेल्या थकव्याचा विसर पडला. चार वाजण्याच्या सुमारास ते दालव्हिनी नावाच्या खेडेगावात आले. दालव्हिनी गावच्या चौबाजूंना हिरवेगार डोंगर होते. त्यांच्या पायथ्याशी जागोजाग लहानमोठे निळेभोर तलाव होते. युद्धाचा आणि उद्योगीकरणाचा स्पर्शसुद्धा त्या शांत, स्वतःमध्ये गुंगून पडलेल्या खेड्याला झाला नव्हता. पण आज त्याच खेडेगावाच्या स्टेशनावर एका बाजूला, दहशत,

विध्वंस आणि मृत्यु हाच अर्थ असलेल्या डी-दिनमोहिमेच्या एका सूत्रधाराची-मॉंटीची खास गाडी उभी होती.

दालव्हिनीला एका हॉटेलातील दोन खोल्यांत हेरवे आणि जेम्सने मुक्काम टाकला. जॅक हेरवे लगेच, जेम्सला एकटाच सोडून, मॉंटीच्या तळावर गेला. एकटा असल्यामुळे जेम्सचे विचारचक्र चालू झाले.

तोतयाच्या कारस्थानाच्या गोष्टी आता वेगात सुरू झाल्या होत्या. सुरुवातीला जेम्सने पोर्टस्माऊथची एक दिवसाची सफर केली, आणि आता तो स्कॉटलंडमध्ये आला होता. आणखी पंधरवड्याने तो कुठे असणार होता, या प्रश्नाचे उत्तर त्याला माहीत नव्हते. धाग्याच्या टोकाला बांधलेल्या एखाद्या पतंगासारखा तो उडत होता आणि धागा सरसर सुटत होता. थोड्याच दिवसात त्याच्या अंगावर मॉंटीचा गणवेष चढणार होता. तो त्याला पेलवणार होता काय ?

जॅक हेरवे थोड्याच वेळात परत आला. मॉंटी आणि जेम्स या उभयतांच्या भेटीची व्यवस्था झाली असल्याची बातमी हेरवेने आणली होती. खरे पाहता जेम्सला या भेटीची आगाऊ कल्पना होती, तरीही तो त्या बातमीने अस्वस्थ झाला.

मात्र ही अस्वस्थता फार काळ टिकली नाही. कारण जॅक हेरवेने त्याला डोंगर-पर्यटन करायला बोलावले. डोंगरपर्यटन करण्यात वेळ छान गेला. काही काळ जेम्सला त्याच्यावरील जबाबदारीचा विसर पडला. पण रात्री अंथरुणावर पडल्यावर मात्र जेम्स पुन्हा परिस्थितीचा पट मांडू लागला.

पगारखात्यातला कारकून जेम्स गुप्तहेरखात्यातला सार्जंट म्हणून मिरवत होता. या सार्जंटचे काम काय ? तर जनरल मॉंटगोमेरीचे निरीक्षण करणे. ते करताना संशय उत्पन्न होऊ न देता त्याच्या परिवारात वावरणे, मोठे कठीण काम होते. थोडीशी गफलत होताच मोठा अनर्थ कोसळला असता, आणि तो निस्तरण्यासाठी गौप्यस्फोटाची किंमत द्यावी लागली असती. शिवाय खुद्द मॉंटीची इतराजी पत्करावी लागली असती ती वेगळीच.

दुसऱ्या दिवशी सकाळी, पुन्हा एकदा मॉंटीच्या ड्रायव्हर्सच्या टोळक्यात सामील होताना जेम्सला उपऱ्यासारखे वाटत होते, कारण वर्षानुवर्षांच्या सहवासामुळे त्या ड्रायव्हर्सना मॉंटीच्या, त्याच्या हाताखालच्या अधिकाऱ्यांच्या वागण्याच्या पद्धती चांगल्याच माहीत झाल्या होत्या. प्रत्येकाला त्यांनी एक एक टोपणनावदेखील बहाल केले होते. सहलीच्या वातावरणामुळे त्यांच्या बाष्कळपणाला ऊत आला होता. जेम्सला काहीच माहीत नव्हते; त्यामुळे तो नवखेपणी चाचपडत राहिला.

बाष्कळपणा करीत असले तरी त्या ड्रायव्हर्सच्या मनात आपल्या अधिकाऱ्यांबद्दल परमावधीचा आदरभाव होता, आणि मॉंटीला तर ते सारे देवासारखाच मानीत असावेत. याला अर्थात मॉंटीची वागण्याची पद्धत कारणीभूत होती. कमालीचा शिस्तप्रिय असूनसुद्धा आपल्या हाताखालच्या माणसांशी तो मनमोकळेपणाने बोलत

असे. त्यांच्याशी चेष्टाविनोद करीत असे. त्यांच्या एखाद्या चतुर उक्तीला हार्दिक दाद देत असे. आपल्या अधिकाराचा तोरा तर तो कधीच मिरवीत नसे. एखाद्या मोठ्या कुटुंबातील आदरणीय पण प्रेमळ कुटुंबप्रमुखासारखा होता माँटी.

माँटीचे हे रूप पाहिल्यावर, हाच माणूस हिटलरची अभेद्य संरक्षक तटबंदी फोडून आपल्या फौजा जर्मनीत नेणार आहे, या गोष्टीवर विश्वास ठेवणे अवघड आहे, असे जेम्सला वाटले. माँटीच्या अहंमन्यतेच्या, कडक शिस्तीच्या अनेक कथा प्रचलित होत्या, पण आता माँटीला जवळून पाहिल्यानंतर त्या खोट्या आहेत अशी जेम्सची खात्री पटली.

युद्धानंतर काही वर्षांनी जेम्सची व माँटीच्या पलटणीतील एका अधिकाऱ्याची भेट झाली. बोलता बोलता माँटीचा विषय निघाल्यावर तो अधिकारी सात्त्विक संतापाने म्हणाला, " माँटी मला कधीच आवडला नाही. तो आपल्याच धुंदीत असायचा नेहमी. हाताखालच्या अधिकाऱ्यांना माँटी म्हणजे कर्दनकाळ होता. "

" तुमचा आणि माँटीचा प्रत्यक्ष संबंध आला होता काय ? " जेम्सने विचारले.

" नाही म्हणजे प्रत्यक्ष संबंध नव्हता आला, पण त्याच्याबद्दलच्या गोष्टी ऐकल्या आहेत ना तशा ! "

या बरोबरच दुसऱ्या एका भेटीची हकीकत सांगायला हवी. युद्ध संपल्यानंतरची गोष्ट. एके दिवशी जेम्स समुद्रकिनाऱ्यावर भटकत होता. इतक्यात एक म्हातारी त्याच्याजवळ येऊन त्याला म्हणाली, " माफ करा, पण माँटीचे ड्रोतये आपणच ना ? "

जेम्सने होकार दिला तेव्हा त्या म्हातारीने भावनावश होऊन त्याचा हात हातात घेतला, आणि ती म्हणाली, " माँटी फार भला माणूस आहे. माझा मुलगा त्याच्या पलटणीत होता. तो युद्धात मारला गेला. तेव्हा जनरलला मी त्याबद्दल लिहिलं होतं. जनरलनं तेव्हा मला ताबडतोब उत्तर पाठवलं आणि आता प्रत्येक नाताळात पत्र पाठवतो तो मला, या गोष्टीचा माझ्या मुलाला केवढा अभिमान वाटला असता. "

जेम्सशी हस्तांदोलन करून ती वृद्धा निघून गेली.

दुसऱ्या दिवशी जेम्स जॅक हेरवेबरोबर माँटीच्या गाडीकडे जायला निघाला. वाटेत हेरवे अनेक विषयांवर मोठे रुचकर वक्तव्य करीत होता; पण जेम्सचे मन माँटीशी होणाऱ्या मुलाखतीचा विचार करीत होते. त्या विचाराने बावरलेले होते. लहानपणापासून वरिष्ठ अधिकाऱ्यांबद्दल जेम्सला वाटत असलेली भीती एकदम उसळून वर आली आणि तिने त्याच्या मनाचा ताबा घेतला.

ही गोष्ट जॅक हेरवेच्या लक्षात आली असावी. त्याने आपली बडबड मध्येच थांबवून जेम्सला रोखून विचारले, " काय झालंय काय तुला ? तुझं लक्ष नाही ठिकाणावर जेम्स. कसला – माँटीबरोबरच्या मुलाखतीचा विचार करतो आहेस की काय ? "

" होय. "

त्यात विचार कसला करायचा? त्या मुलाखतीची धास्ती बाळगण्याचं काही कारण नाही. मॉंटी म्हणजे काही मन मानेल तशी शिक्षा फर्मावणारा हुकूमशहा नव्हे."

"ते माहीत आहे मला."

"मग कसली चिंता आली आहे? अरे बुद्रुक माणसाबरोबर वागणंच कठीण असतं. ती माणसं अधिकार गाजवण्यासाठी हापापलेली असतात. मॉंटीसारख्या मोठ्या माणसांशी वागणं फार सोपं आणि सरळ असतं."

ते पुढे चालू लागले.

"तुला ती नेपोलियन आणि स्वीडिश सैनिकाची गोष्ट माहीत आहे का जेम्स?" जॅकने मध्येच विचारले आणि उत्तराची वाट न पाहता तो ती कथा सांगू लागला, "नेपोलियन आपल्या सैन्यातल्या बहुतेक सैनिकांना ओळखत असे. पण अनोळखी असा एखादा सैनिक भेटलाच तर तो त्याला तीन प्रश्न ठराविक क्रमाने विचारीत असे : तुझे वय किती? तू किती वर्षे ही नोकरी करतो आहेस? मी केलेल्या शेवटच्या किंवा त्याच्या आधीच्या मोहिमेत तू भाग घेतला होतास काय?

त्याच्या सैन्यात एक स्वीडिश सैनिक होता, त्याला अर्थात फ्रेंच भाषा अवगत नव्हती. म्हणून त्याच्या मित्रांनी त्याला नेपोलियनचे प्रश्न आणि त्यांचा क्रम समजून सांगितला होता, आणि त्यांची फ्रेंच उत्तरं त्याला पढवून ठेवली होती.

एकदा सैन्याची पाहणी करताना नेपोलियनला हा स्वीडिश सैनिक अनोळखी वाटला. त्याने थांबून त्याला ते नेहमीचे तीन प्रश्न विचारले. पण काय लहर आली होती नेपोलियनला कुणास ठाऊक, त्याने त्या प्रश्नांचा नेहमीचा क्रम बदलला. स्वीडिश सैनिकाने मात्र पढवलेली उत्तरे त्याचक्रमाने देऊन आपली कामगिरी चोख बजावली!

"तू किती वर्षे नोकरी करतो आहेस?"

"तेवीस."

"तुझं वय काय?"

"तीन."

"काय तीन? म्हणजे एक तर तू किंवा मी – दोघांपैकी कोणीतरी चक्रम असलं पाहिजे."

"दोन्ही!"

जेम्स मोठ्याने हसू लागला. गाडीशी पोहोचेपर्यंत त्याचा आत्मविश्वास टवटवीत झाला होता.

दालव्हिनी स्टेशन लहानसेच होते. एक छोटसे तिकीटघर आणि जवळच रेल्वेकर्मचाऱ्यांसाठी असलेली काही छोटी घरे एवढाच त्याचा पसारा होता. फलाटा-

पासून शंभर फुटांवर, एका बाजूला, माँटीची ती खास गाडी होती. त्यात दोन डबे मोटारींसाठी आणि एक सामानासाठी होता. उरलेल्या चार डब्यांत स्वैंपाकघर, जेवणघर, शयनगृह आणि माँटीचे कार्यालय यांची व्यवस्था होती. जागोजाग रक्षक उभे होते. बाजूच्या रस्त्यावर माँटीच्या रोल्सराईससकट बाकीच्या मोटारी उभ्या होत्या. नेहमीप्रमाणे त्यांचे ड्रायव्हर्स बाजूला उभे होते.

हेरवे आणि जेम्स दिसताच ड्रायव्हरचे बोलणे बंद पडून ते त्यांच्याकडे पाहू लागले.

जॅक हेरवेने आगमनाची वर्दी दिल्यावर कर्नल डॉने बाहेर आला. त्याने जेम्सला एका विशिष्ट जीपमध्ये बसण्याचा आणि एरव्ही ड्रायव्हरबरोबर राहण्याचा हुकूम दिला. हुकमाप्रमाणे जेम्स त्या जीपमध्ये जाऊन बसला. त्याने आजूबाजूला पाहिले. मंडळी हास्यविनोद करीत होती आणि त्यांनी शांततेच्या काळी सहलींना करावे तसे मोठे चमत्कारिक पोशाख केले होते. माँटीच्या तळावर गणवेषाच्या बाबतीत इतका सैलपणा पाहून जेम्सला आश्चर्य वाटले. त्याचे कारण मात्र त्याला लगेच कळले. खुद्द माँटीनेच मुळी आपला गणवेष चढवला नव्हता !

सहल असली तरी विशिष्ट शिस्तपालन काटेकोरपणे केले जात होते. माँटीच्या सकाळच्या आगमनाचा सोहळा त्याच्या तळावर जेम्सने पहिल्या दिवशी अनुभवला होता. तो सहलीवरसुद्धा तसाच साग्रसंगीत पार पाडण्यात येत होता. बरोबर बाराव्या आकड्याला माँटी बाहेर आला, आणि सहास्य मुद्रेने मोटारीत जाऊन बसला.

थोडा वेळ झाला तरी माँटीचा निघण्याचा हुकूम मिळेना. जेम्सने पाहिले तो माँटी स्टेशनजवळच्या त्या घरांच्या दिशेने पाहात होता. गच्च्यांवर कितीतरी बायका–मुले गोळा झाली होती, आणि हातात छोटे छोटे युनियन जॅक्स घेऊन हात हालवीत होती. माँटीनेदेखील हसून, हात हलवून त्यांचा निरोप घेतला आणि मगच मोटारींना निघण्याचा हुकूम मिळाला.

काही लोकांना या प्रकारात माँटीचा दिखाऊपणा दिसला असता; पण जेम्सला मात्र तसे वाटले नाही. माँटीला लहान मुले फार आवडत होती, आणि त्या उत्साही स्कॉटिश मुलामुलींचा विरस होऊ नये याची त्याने काळजी घेतली होती. आपल्याला जाताना त्यांना पाहायचे आहे हे ओळखून ते सारे हुश्शार होईपर्यंत तो थांबला होता.

एका सेनापतीच्या वागण्यातली ही हृद्यता जेम्सला मोठी मनोहर वाटली. ¤

माँन्टीच्या मोटारींचा काफिला सहलीला निघाला. प्रत्येक दोन मोटारींमध्ये पाच फुटांचे अंतर कटाक्षाने राखण्यात येत होते. आजूबाजूला स्कॉटलंडचा निसर्ग आपल्या रम्य सौंदर्याची मुक्त उधळण करीत होता. अचानक रस्त्याच्या बाजूला

उभ्या असलेल्या एका दगडी इमारतीचे दर्शन झाले. मोटारींच्या इंजिन्सच्या आवाजाच्या वर गेलेला मुलांच्या गाण्यांचा आवाज ऐकू आला. अर्थात ती खेडेगावातली शाळा होती. माँटीने तावडतोब थांबण्याचा हुकूम दिला. गाडीमधून उतरून, इमारतीसमोरचे छोटेसे क्रीडांगण ओलांडून, उघड्या दरवाजातून माँटी आत गेला. गाणे अकस्मात थांबले, आणि मुलांनी एकमुखाने केलेला माँटीचा जयजयकार ऐकू आला. त्यानंतर माँटी बोलू लागला. प्रत्यक्ष बोलणे ऐकू आले नाही तरी माँटी मुलांशी समरस होऊन कसे बोलत असेल, याची कल्पना जेम्सला सहज करता आली. माँटीला लहान मुले आणि तरुण माणसे फार आवडत असत. युद्ध संपल्यानंतर, सरे परगण्यातील ज्या शाळेत त्याचा मुलगा होता त्या शाळेच्या कारभाराची व्यवस्था माँटीने स्वीकारली होती. तेथे तो मुलांबरोबर गप्पा मारीत जेवण घेई; त्यांच्याशी हास्यविनोद करी; त्यांना गमतीदार कोडी सोडवायला देई.

युद्धक्षेत्रापासून दूर, स्कॉटलंडच्या एका खेडेगावात एक विख्यात सेनापती त्याच्या परिवारासह येणे, तेथील शाळेतील गुडघ्याएवढ्या पोरांपुढे त्याने भाषण करणे ही गोष्ट निश्चितच विलक्षण होती. विशेषत: हा सेनापती पुढील मोहिमेच्या सिद्धतेसाठी रात्रंदिवस राबत असेल, या सर्वसाधारण कल्पनेच्या पार्श्वभूमीवर तर ती गोष्ट अधिकच विचित्र भासत होती. कामातून आणि त्याच्या जाचक जबाबदाऱ्यांतून हवे तेव्हा स्वत:ला अलिप्त करण्याची कला माँटीजवळ खचितच होती.

थोड्या वेळाने माँटी बाहेर आला. त्याचा चेहरा आनंदाने उजळला होता. बाहेर येऊन तो मोटारीत बसला. मोटार सुरू झाली. त्याच्या मागोमाग आलेल्या शिक्षकांनी आणि मुलांनी त्याचा प्रचंड जयजयकार केला.

मधूनमधून एखादे रम्य स्थळ दिसले किंवा चालावेसे वाटले तर माँटी मोटारी थांबवण्याचा हुकूम देत असे. या प्रसंगी माँटीला न्याहाळणे जेम्सला बरेच सोपे गेले. कारण डी–दिनाच्या रंगीत तालमीपेक्षा सहलीचे वातावरण कितीतरी मोकळे होते. माँटी स्वत: सहलीचा आनंद मनमुराद उपभोगीत होता. विद्यार्थ्यांना बरोबर घेऊन सहलीला आलेल्या एखाद्या हौशी, रसिक शिक्षकासारखा तो वागत होता.

दुपार चढू लागली तेव्हा सावलीचे ठिकाण पाहून गाड्या उभ्या करण्यात आल्या. माँटी आणि त्याचे सहकारी अधिकारी गवतावर गोलाकार बसले. तेथून जवळच एका भिंतीच्या आडोशाला ड्रायव्हर्स आणि इतर नोकर मंडळी कोंडाळे करून बसली. जेम्स अर्थात त्यांच्यात होता आणि माँटीला न्याहाळण्याचे आपले काम चिकाटीने करीत होता.

हा वेळपर्यंत माँटीच्या काही खास लकबी त्याने स्मरणात साठवल्या होत्या : पाठीशी हात गुंफवून शरीराला झोके देत चालणे, विचार करताना गालावरची कातडी चिमटीत पकडणे, एखादा मुद्दा ठासून पटवताना हात विशिष्ट पद्धतीने हवेत उडवणे या गोष्टी त्यांतील बारकाव्यांसहित जेम्सने टिपल्या होत्या, पण आता

आणखी एक प्रश्न उपस्थित झाला : माँटी जेवतो कसा ?

हा प्रश्न वाटतो तितका साधा नव्हता. कारण लवकरच माँटीच्या निकटवर्ति-यांच्या देखत खास माँटी–पद्धतीने जेवायची पाळी जेम्सवर येणार होती. जेवताना एखाद्या माणसाला न्याहाळणे सोपे असते. त्यामुळे त्या बाबतीत जेम्सने गफलत केली तर सगळाच घोटाळा होणार होता. आणि म्हणून माँटी किती हळू वा जलद जेवतो, जेवताना तो कसा बोलतो, त्याचे हावभाव कसे होतात हे बारकाईने पाह-ण्याचा प्रयत्न जेम्स करीत होता.

सहल संपवून जेम्स हॉटेलातल्या खोलीवर आला. जॅक हेरवे त्याचे मनोगत जाणण्यासाठी अत्यंत उत्सुक होता. आवाज सोडता बाकी माँटीची नक्कल करणे आपल्याला व्यवस्थित जमू शकेल, असा आत्मविश्वास जेम्सने प्रकट केला. हेरवेने तेथल्या तेथे जेम्सला त्या नकलेची झलक देण्यास सांगितले. तावडतोब हात मागे गुंफवून आणि मान ताठ करून जेम्स माँटीच्या चालीने खोलीत फेऱ्या मारू लागला. फेऱ्या मारता मारता माँटीच्याच थाटात त्याने विलक्षण हुकूम द्यायला, मोहिमेचे विश्लेषण करायला सुरुवात केली : विमानदल पाच लाख प्रतिमा–सैनिकांना (dummy soldiers) जर्मनीत उतरवील; त्यांच्यावर केलेल्या प्रतिहल्ल्यात जर्मनांचा सगळा दारूगोळा संपून जाईल; त्यांचा पराभव केल्याबद्दल रोमेल आणि त्याच्या बहाद्दर सैनिकांचा बर्लिनमध्ये खुद्द हिटलरच्या हस्ते सन्मान करण्यात येईल; आणि या गडबडीत खऱ्या दोस्त फौजा जर्मनीत उतरून विजय संपादन करतील' –अशीकल्पनारम्य मोहीम जेम्सने माँटीच्या थाटात रंगवून सांगितली. अर्ध्यातच जॅक हेरवे आणि जेम्स हसू लागले. त्यामुळे नक्कल तिथेच थांबली. माँटीच्या भूमिकेत जेम्स भल्याभल्यांना चकवू शकेल, अशी हेरवेची खात्री झाली.

नंतरचे काही दिवससुद्धा जेम्सने माँटीच्याच मागे घालवले. त्याची बारीकसारीक हालचाल आणि विशिष्ट परिस्थितीत चेहऱ्यावर उमटणारे विशिष्ट भाव यांचा अभ्यास केला. त्यामुळे माँटीइतका मनावर ताबा असलेला माणूस विरळा, असे त्याला म्हणावेसे वाटले.

डी–दिनाच्या आगामी मोहिमेकरता सारे राष्ट्र अधीर झाले होते. ही मोहीम विजयी ठरेल की अपेशी ठरेल, या प्रश्नाचे उत्तर आपल्या परी देत होते. एका विचित्र दडपणाखाली ते हुरहुरत होते. आणि जी थोडी माणसे या परिस्थितीतही अविचल होती, त्यात माँटी होता. वास्तविक त्या मोहिमेचा एक सूत्रधार म्हणून त्याने अधीर होणे, त्याला हुरहूर वाटणे स्वाभाविक होते. पण अंतर्गत प्रवाहांना दाद न देता समुद्रातून डौलाने मार्ग आक्रमिणाऱ्या एखाद्या भक्कम जहाजासारखा आहे माँटी, असे जेम्सला वाटले.

अखेर एकदा मुलाखतीचा दिवस उजाडला. त्या दिवशी संध्याकाळी गाडीतील माँटीच्या खास डब्यात ही मुलाखत होणार होती. मुलाखतीला निघताना जेम्सला

वाटले, माँटीसारखी हुकमत आणि अलिप्तता आपल्याजवळ असती तर किती बरे झाले असते. जेम्सची छाती तर धडधडत होती. माँटीने आपली ती करडी नजर रोखली की, आपली वाचा बंद होईल, अशी भीती त्याला वाटत होती.

जेम्सने दार ठोठावले. "आत ये" असा धीरगंभीर आवाज ऐकू आला. जेम्स आत गेला. टेबलाशी बसून माँटी रोजनिशी लिहीत होता. जेम्सकडे लक्ष गेल्यावर तो हसतच उभा राहिला.

दोघे असे समोरासमोर उभे असताना, आरशात आपण आपले प्रतिबिंबच पाहतो आहो, असे जेम्सला वाटले. दोघांमध्ये खरोखर विलक्षणच साम्य होते. त्यामुळे आपला शोध लागल्यावर गुप्तहेरखात्याला किती आनंद झाला असेल आणि नाउमेद होऊन आपण ही कामगिरी अंगाबाहेर टाकण्याचा यत्न केला तेव्हा त्यांना किती वाईट वाटले असेल, याची पुरेपूर कल्पना जेम्सला आली. सर्व रंगभूषा करून नटाचा चेहरा दुसऱ्या व्यक्तीसारखा दिसला तरी रंगभूमीवर त्याचे केवढे कौतुक होते. आणि जेम्सच्या बाबतीत तर माँटीसारखे दिसायला खोटया भुवयांची, गालफाडे रुंद–बसकी करण्याची वा कातडीचा रंग बदलण्याची–कसलीच आवश्यकता नव्हती! माँटी आणि जेम्स यांच्यांत जुळया भावांइतके तंतोतंत साम्य होते. नंतर जेम्सला असे आढळले की, त्या दोघांच्या बालपणातसुद्धा खूपच साम्य होते.

अशाच तऱ्हेचे विचार माँटीच्याही मनात चालू होते की काय ते कळणे कठीण होते. जेम्सच्या मनावर मुलाखतीपूर्वी पडलेले दडपण लवकरच नाहीसे झाले. तो मोकळेपणाने बोलू लागला. दोघांच्या गप्पांना रंग चढला.

आपला जन्म ऑस्ट्रेलियातील पर्थ शहरात झाला आहे, असे जेम्सने सांगताच माँटीची आणि त्याची कुंडली जमायला वेळ लागला नाही. कारण माँटीचे वडील हे जवळच्याच टास्मानियाचे बिशप होते. माँटी आत्मीयतेने आपल्या वडिलांबद्दल बोलू लागला. मिळेल त्या वाहनाने आपल्या अखत्यारीतील विभागाचा दौरा करण्याची त्यांची पद्धती, जवळजवळ प्रत्येक माणसाशी त्यांची असलेली ओळख, त्यांचे अनुभव यांचे वर्णन तो करू लागला. जेम्सला वाटले, त्या धर्मगुरूचा हा सरसेनापती झालेला मुलगा काही बाबतींत अगदी वडिलांसारखाच आहे. सरसेनापती असूनही सतत युद्धाच्या आघाडीवर राहण्याचा त्याचा प्रयत्न असतो, आणि कोणताही सामान्य सैनिकसुद्धा त्याला मित्रासारखा वाटतो.

बोलता बोलता माँटी पुन्हा उभा राहिला. त्यामुळे त्याला अधिक बारकाईने पाहणे जेम्सला शक्य झाले. त्याचबरोबर माँटीचा काहीसा वरच्या सुरातला, धारदार आवाज आणि त्याची शब्दांची निवड लक्षात ठेवण्याचा प्रयत्न तो करीत होता. मोठे आणि अवघड शब्द वापरायची त्याला सवय नव्हती. काहीजणांनी तर त्याचे बोलणे रुक्ष आणि अनाकर्षक असते, असे म्हटले आहे.

जेम्सच्या पहिल्या महायुद्धातील सैनिकी अनुभवाबद्दल आणि नंतरच्या नागरी

जीवनाबद्दल माँटीने काही प्रश्न विचारले. आणि जेम्स नट आहे असे समजल्यावर त्याने जेम्सशी रंगभूमीसंबंधी मोठ्या जिव्हाळ्याने गप्पा मारल्या. लेस्टरप्रमाणेच माँटीलाही रंगभूमीची चांगली माहिती आहे, हे पाहून जेम्सला आश्चर्य वाटले.

माँटी म्हणाला, "तुझ्यावर फार मोठी जबाबदारी आहे. तुला आत्मविश्वास वाटतो ना?" उत्तर देण्यासाठी जेम्स शब्द जुळवत असताना माँटीच पुन्हा म्हणाला, "काही काळजी करू नकोस. सारं काही ठीक होईल." या शब्दांसरशी जेम्सच्या मनातील अविश्वास आणि कातरता नष्ट झाली. हस्तांदोलन करून जेम्स बाहेर पडला.

हॉटेलकडे परतताना, त्या साध्यासुध्या खोलीत बसलेल्या, एकाकीपणे युद्धाची जबाबदारी पेलणाऱ्या माँटीची मूर्ती जेम्सच्या डोळ्यांसमोर पुन्हा पुन्हा येत होती. माँटीच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल नकळत तो विचार करू लागला.

माँटी होयबा नाही हे सर्वविहित होते, आणि मोहिमेच्या आखणीत त्याचा मोठा वाटा होता. त्या बाबतीत त्याने अनेकदा पारंपरिक संकेत झुगारून दिले होते. त्यामुळे आणि कामचुकारपणा चालू न देण्याच्या त्याच्या कठोर स्वभावामुळे माँटीने नकळत विरोधकांचे मोहोळ उठवले होते. मोहीम भविष्याच्या उदरात असेतोपर्यंत विरोधक काही करू शकत नव्हते; पण ती कार्यान्वित झाल्यावर अपयशाची चाहूल लागती तर ते माँटीवर लांडग्यासारखे तुटून पडायला तयार होते. माँटीच्या मनावरचे हे ओझे अवजड होते. पण ज्याने आफ्रिकेमध्ये अजिंक्य रोमेलला वाळू चारली त्याला या ओझ्याचे काय?

युद्ध संपल्यानंतर जनरल माँटगोमेरीबद्दल जितकी अविवेकी आणि बेजबाबदार टीका जेम्सच्या कानांवर आली तितकी दुसऱ्या कोणा अधिकाऱ्याबद्दल आली नसेल. विनाविश्रांती माँटी सैनिकांना रणांगणावर ताबडवीत असे म्हणे. एल् अलामेनच्या जगप्रसिद्ध लढाईमध्ये, वरिष्ठांच्या विरोधाला न जुमानता माँटीने सैनिकांना छत्तीस तासांची विश्रांती दिली होती, याचा टीकाकारांना सोईस्करपणे विसर पडला होता.

माँटीचा कल्पित दिखाऊपणा आणि लोकप्रियतेचा हव्यास हा टीकाकारांनी चघळलेला आणखी एक मुद्दा! या बाबतीत, त्या गुणामुळे (किंवा अवगुणामुळे) साधलेल्या इष्ट परिणामाकडे लक्ष दिले पाहिजे, असे जेम्सला वाटे. आणि शिवाय माँटीच्या सहवासात जेम्सला आलेला अनुभव अगदी वेगळा होता. वस्तुस्थितीपासून दूर जाणे, कल्पनेचा इमला रचणे हे जे भंपकपणाचे, दिखाऊपणाचे सर्वांत प्रमुख लक्षण ते माँटीच्या ठायी जेम्सला कधीच आढळले नव्हते. युद्धामध्येदेखील प्रत्यक्ष परिस्थितीच्या अवलोकनवरच आपले पवित्रे तो योजीत असे.

युद्ध परिस्थितीवरची माँटीची पकड इतकी पक्की असे की त्या संदर्भात वरिष्ठ विरोधकांचाही समाचार घेण्यास तो मीडभाड बाळगत नसे. त्यामुळे माँटी उद्धट आहे, असा त्या विरोधकांचा दृढ समज झाला होता. जेम्सला वाटले, ते औद्धत्य नव्हते. ती स्वतःच्या भूमिकेबद्दलची अविचल निष्ठा होती! ◻ [अपूर्ण]




---

## बाबू टांगेवाला

---

तात्यासाहेब केळकरांनीही शब्दचित्र रेखाटावे असा बाबू टांगेवाला. १९४६ च्या 'सह्याद्रि' मासिकात तात्यासाहेब लिहितात, 'वा, बाबू टांगेवाल्याचे नाव मला माहीत नाही असे कसे होईल ? जिमखान्यावर कुणाही हिंदी खेळाडूने शंभरावी धाव काढल्याबरोबर बसल्या जागेवरून उठून मैदानावर धावत जाऊन त्याच्या गळचात हार घालणारा व या सत्काराकरिता दोन–तीन मिनिटे खेळांत खंड पाडणारा बाबू टांगेवाला माहीत नाही तर वर्तमानपत्रवाला कशाला व्हावे ?"

परवाच बाबूरावांकडे मी गेलो होतो. बाबूराव अंथरुणाला खिळून होते. ससून हॉस्पिटलमध्ये १०–१२ दिवस वारीही ते करून आले. "रेगे, अंगात बघा त्राणसुद्धा राहिला नाही. डोळचांना नीट दिसत नाही. इंजक्शनं दिल्यामुळे सारखी खा खा सुटते पण खिशात पैसा नाही." "म्हणून तर बाबूराव, मी तुमच्याकडे आलोय. अहो, तुमच्याकरिता आम्ही एक सहायक समिती नेमीत आहोत. बाळ पंडित, गंगाधर महांबरे, अशोक सिधये आणि मी तुम्हांला शक्य होईल तेवढी आर्थिक मदत देण्याचा प्रयत्न करणार आहोत. आचार्य अत्र्यांनी आम्हांला तुमच्याकरिता १०१ रु. ची देणगी दिली आहे." तेव्हा बाबूराव खुललेच. "अत्रेसाहेब म्हणजे दिलदार माणूस. मागे त्यांच्या 'शिवशक्तीत' मी गेलो होतो. साहेबांना म्हटले, तुम्ही जसे बी. ए. बी. टी., टी. डी. लंडन तसा मीही पी. एच्. डी. आहे." "बाबू तू कसा पी. एच्. डी." तर मी म्हणालो, 'पूना हॉर्स ड्रायव्हर.' तेव्हा अत्रेसाहेबसुद्धा जोरजोराने हसले.

"काहो रेगे, मी लता मंगेशकरांना हार घालायला गेलो तर परवानगी देतील का ?"

"का नाही देणार. तुमचा हार म्हणजे पुण्याचाच हार ! पण बाबूराव, तुम्ही जाणार कसे ? असे आजारी."

"का ?" बाबूराव आत्मविश्वासाने उत्तरले, "मी रिक्शा करून जाईन !"

म्हणजे कर्तृत्वाचे कौतुक करावयास बाबूरावांना आर्थिक विवंचनेचे सोयरसुतकही नाही. खा खा सुटते पण पैसा नाही. पण हार घालावयाचा म्हटले की बाबूराव आपल्या सगळ्या अडचणी, दु:ख, हालअपेष्टा सर्व काही विसरतात.

बाबूरावांचे वय आज ६४ वर्षांचे आहे. गेली तीस-चाळीस वर्षे क्रिकेट शौकिन आणि प्रेक्षक या नात्याने त्यांनी खेळाची निरपेक्ष आणि अखंड सेवा केली. नाना जोशी म्हणतात की, कॉलेजात असताना ७० धावा झाल्या की माझा जीव कासावीस होत असे. बाबूचा हार आपल्या गळ्यात पडला पाहिजे. आपले शतक झाले पाहिजे. अशी हुरहूर लागून राही आणि त्यापुढचा खेळ धीमा आणि अधिक एकाग्रचित्ताने होत असे. बाबू टांगेवाला म्हणजे क्रिकेटपटूंच्या कर्तृत्वाची तावडतोब पोच देणारा आणि त्याला त्वरित प्रसिद्धी आणि प्रतिष्ठा देणारा एक किमयागारच होता.

१९५९ च्या ब्रेबर्न स्टेडियमवरील ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी सामन्यात पोलिसांचा आणि सैनिकांचा इतका कडेकोट बंदोबस्त होता तरी बाबूरावांनी कुंपणावरून उडी घेऊन शतकवीर नील हार्वेना हार घातलाच. बाबूरावांचे वेड हे असे आहे. तिथे जात नाही, पात नाही, धर्म नाही, तंटा नाही, हा माझा, हा तुझा नाही. खेळाडू हाच त्यांचा धर्म ! हॅसरे, हनीफ, वॉरेल, ओनील, स्टॉलमेयर, बुचर, अब्दुल हफीज, बिल् अॅले अशा कितीतरी परदेशी क्रिकेटपटूंच्या शतकाचे बाबूरावांनी भर प्रेक्षकांत कौतुक केले आहे. मर्चंट, हजारे, मनकड, उम्रीगर, अधिकारी, फडकर यांच्या गळ्यात तर यांनी किती हार घातले असतील याची कल्पनाच करवत नाही.

"बाबू हा पुण्याचा रहिवासी. त्याचं एक लहानसं घर आणि शेत आहे." तात्यासाहेब केळकर बाबूची मुलाखत लिहीत आहेत. "त्याचं शिक्षण मराठी शाळेतच संपलं. फार तर इंग्रजी पहिलं पुस्तक त्यानं पाहिलं असेल. तो स्वतः अगदी लहानपणी क्रिकेट खेळे. प्रौढपणी त्याला ते खेळता आले नाही. पण हौस मात्र मनात फार राहिली. त्याने स्वतःचा टांगा ठेवून धंद्याला सुरुवात केली. क्रिकेटचा हंगाम सुरू झाला म्हणजे तो मधून मधून सुटी घेतो. यामुळे त्याची प्राप्ती बुडते. पण ती तो आनंदाने सोसतो. ........गुणग्रहणाची त्याची बुद्धी उदार आहे. कारण त्याच्या हाराचे बक्षीस धावा काढण व दांडी पाडणे अशा कोणत्याही पराक्रमाला मिळते. इतकेच नव्हे, तर पराक्रमी ठरणारा मनुष्य विदेशी असला, तरी त्याला चालतो."

बाबूरावांच्या बक्षिसीची किंमत करताना तात्यासाहेब म्हणतात, "क्रिकेटच्या आवडीमुळे त्याने नुसते हार घालण्यातच पैसे खर्च केले असे नसून, त्याने पूर्वी एक दोन रुपयांचे पैसेही बक्षिसाकरिता ठेवले होते. पण त्याचे ते घेऊन गेल्यामुळे आता यापुढे निदान एक तरी फिरता पेला ठेवण्याचा त्याचा विचार असून, त्याकरिता लागेल तो खर्च करण्याची त्याची उमेद आहे. मला वाटते. या लहानशा पेल्याला क्रिकेटप्रेमी लोक रणजी ट्रॉफीच्या पेल्याइतकी मनाने किंमत देतील."

डॉन ब्रॅडमनना १९४९ मध्ये इंग्लंडच्या राजाने ' सर ' किताब दिल्यानंतर बाबूरावांनी सर डोनॉल्ड यांचे अभिनंदन केले आणि त्यांना एक रौप्यपदक पाठविला. सर ब्रॅडमन यांनीही बाबूरावांच्या क्रिकेट प्रेमाचे कौडकौतुक केले. ६१ साली पानशेत पुरात बाबूरावांची सर्व मालमत्ता वाहून गेली. त्यात ते पत्रही गेले. क्रिकेटसाठी ज्याने सर्वस्व वेचले त्याच्याकडे आता उरलंय् काय कुणाला द्यावयाला. पण अशा हलाखीच्या परिस्थितीतही बाबूराव अंथरुणातून उठले आणि हार घेऊन लता मंगेशकरांचे अभिनदन करावयास गेले. तो हार तसाच राहिला. कारण आता कुंपणावरून उडी घेऊन कर्तृत्वाचे कौतुक करावयाचे शारीरिक सामर्थ्य आहे कुठे त्यांच्यात ! गाईचे सोंग आणणाऱ्या बहुरुप्याला गवळयाच्या पोराने अंगावरचे घोंगडे बक्षीस देऊन टाकले. पण अंगावरचे घोंगडे गेल्याने ते गवळयाचे पोर रात्रभर थंडीत कुडकुडत बसले आहे. तशीच विपन्नावस्था आज बाबू टांगेवाल्याची झाली आहे. " श्री. बाबू टांगेवाला सहाय्यक समिती " नेमून निदान ती घोंगडी तरी त्यांना परत मिळवून देण्याचा आमचा प्रामाणिक प्रयत्न आहे. क्रिकेटपटू आणि क्रिकेट रसिक त्याला हातभार लावतील अशी अपेक्षा आहे.

—मनोहर रेगे





७ दिवसांची उपचार-योजना—फक्त २ रु. पेक्षां थोड्या जास्त खर्चांत



Nital

नितल
मुरुम पुटकुळयांवरील औषधि क्रीम

- जंतुनाशक औषधि द्रव्यांनीं युक्त.
- वेळींच लावण्यास सुरवात केली तर पॅच वा डाग राहात नाहीत
- फक्त २% इतका कमी गंधकाचा अंश असणारें एकमेव उत्पादन
- फक्त 'नितल' मध्येंच, व्हिटॅमिन 'एफ्' असते की जे व्रण राहूं न देतां मुलायम त्वचा निर्माण करते,




प्रतिबंधात्मक उपचार

मुरुमें, पुटकुळया चिघळूं नयेत किंवा बऱ्या झाल्यावर त्यांचा पुन: उपद्रव होऊं नये म्हणून, तुमच्या आवडीच्या तेल रहित फेस क्रीममध्यें थोडंसे 'नितल' मिसळून तें नेहमीं वापरा.

सर्व प्रमुख केमिस्टांकडे मिळतें.

बृहन्मुंबईकरिता वितरक
**मे. बी. जयंतीलाल अॅण्ड को.**, १५ मंगलदास रोड, मुंबई २
बृहन्मुंबईखेरीज महाराष्ट्रासाठी वितरक
**मे. एस्. एम्. प्रभू अॅण्ड सन्स**, १५ हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ५७



चौथी सचित्र आवृत्ती

□□

# राजा शिवछत्रपति

□□

ब. मो. पुरंदरे

□□

मूल्य : रुपये बेचाळीस फक्त

□□

राजहंस प्रकाशन

# रंगभूमी

## माझा कुणा म्हणू मी ?

चालणाऱ्या मराठी नाटकांचं अचूक गणित काही नाटककारांनी बसवले आहे. अशा मंडळींमध्ये बाळ कोल्हटकर, विद्याधर गोखले, वसंत कानेटकर, बाबूराव गोखले (लेखक–दिग्दर्शक अशा दुहेरी नात्याने) ही मंडळी अग्रस्थानी असली तरी काही नवीन नाटककार व्यावसायिक-दृष्टचा यशस्वी झालेल्या या नाटककारांच्या मालिकेत येऊ पाहात आहेत. दत्ता केशव (दत्ता कुलकर्णी) यांचे नवीन नाटक " माझा कुणा म्हणू मी ?" हे नवीन नाटक पाहिले, आणि कुलकर्णी या मालिकेत प्रवेश मिळवण्याच्या धडपडीत आहेत असे वाटू लागले.

यशस्वो चित्रपटांसाठी मद्रासी निर्मात्यांनी एक विशिष्ट फॉर्म्युला तयार केला आहे. या फॉर्म्युल्याप्रमाणे तयार होणाऱ्या चित्रपटांपैकी ऐंशी टक्के चित्रे पैसा मोकळा करून देतात. उरलेल्यापैकी बहुतेक सर्व निदान तोंडमिळवणी करून देतात. स्वाभाविकपणे या रुळलेल्या वाटेने निर्माता-पुढील चित्र तयार करतो. काही मर्यादित प्रमाणामध्ये हेच तंत्र मराठी रंगभूमीवर चालणाऱ्या नाटकांच्या संदर्भात लागू पडते. आता वानगीदाखल दत्ता केशवांचे " माझा कुणा म्हणू मी ?" पाहाना–नाटक सामाजिक, कोणत्याही विशेष प्रश्नाचा

ऊहापोह नाही. (म्हणजे प्रॉब्लेम ड्रामा नाही) भावनला हात घालणारी कथा, आनंद-दुःख, मत्सर, प्रीती, उदात्तता, तडजोड या सर्व भावनांना हात घालून आकर्षक संवादांद्वारे उभा केलेला सुंदर डोलारा, असे या कथावस्तूचे स्वरूप आहे.

एक निवृत्त शाळा मास्तर, एक चिरंजीव, सून आणि एक कन्या; स्वतंत्र धंद्याची स्वप्ने पाहात चिरंजीव स्वस्थ आहेत. कर्ज काढून स्वतःच्या कन्येचे लग्न लावल्याने सूनबाई नाराज आहेत. या पार्श्वभूमीवर नाटकाची सुरुवात होते. घरामध्ये सूनबाईंच्या डोहाळजेवणाची तयारी चालू असते. आपल्या भावजयीच्या डोहाळजेवणासाठी नवविवाहित माधवी येणार असते. सूनबाई माधवीचे स्वागत करण्यास उत्सुक नसतात. परंतु माधवी घरामध्ये आल्यावर माधवीकडून आर्थिक मदत घेऊन आपल्या नवऱ्याला भांडवल पुरवता येईल या आशेवर माधवीचे स्वागत केले जाते. माधवीकडून अपेक्षा पूर्ण होत नाहीत. आणि पुन्हा मत्सराला सुरुवात होते.

## *मद्रासी फॉर्म्यूलातील एक नवे नाटक*

माहेरी आलेली माधवी आपल्या सूटकेसच्या चाव्या विसरलेली असते. श्रीधर (माधवीचा पती) मोठ्या उत्साहाने स्कूटरवरून चाव्या आणण्यासाठी निघतो आणि वाटेत दुर्दैवी अपघाताला बळी पडतो. अंगावरील हळद वाळण्यापूर्वीच माधवी विधवा होते. याच वेळी डॉक्टर राम पटवर्धन अवतीर्ण होतात माधवीशी लग्न करण्याच्या इच्छेने. वडिलांनी हुंड्याची अट घातल्याने मुलगी पसंत असूनही डॉक्टर साहेबांना लग्न करणे शक्य होत नाही. वडिलांच्या निधनानंतर डॉक्टर या लग्नास तयार होतात. माधवी भांडवाखालून होरपळून निघाल्याचे वृत्त त्यांच्या कानांवर नसते. तथापि या बदललेल्या परिस्थितीतही डॉक्टर विवाहास तयार होतात.

वर्षाभरात राम-माधवी विवाहबद्ध होतात.

पति-पत्नींचे संबंध येण्यापूर्वीच डॉक्टरांच्या हॉस्पिटलमध्ये स्मृतिभ्रंशाचा पेशन्ट असलेला श्रीधर माधवीच्या पाहण्यात येतो. हा श्रीधर का दुसरा कुणी, या शंकेने ती व्याकुळ होते. आपल्या शंकेचा पडताळा घेण्याचा प्रयत्न सुरू करते. एक पेशन्ट व आपल्या पत्नीमधील जवळीक पाहून डॉक्टर अस्वस्थ होतात. माधवीच्या, तसेच श्रीधरच्या वडलांना बोलावण्यात येते. श्रीधरवर शस्त्रक्रिया करण्यात आल्यावर तो (माधवी—डॉक्टरच्या सुखासाठी) आपण श्रीधर नसून अविनाश असल्याचे जाहीर करतो.

इकडे आड तिकडे विहीर अशा संकटात सापडलेल्या माधवीचा डॉक्टरमजकुरांबरोबर सुखैनैव संसार सुरू होतो.

मुख्य कथानकाला पूरक ठरावे अशा पद्धतीने माधवीचा भाऊ व त्याची पत्नी यांचे उपकथानक सुंदर प्रकारे जोडले आहे. कथेच्या गांभीर्याला धक्का लागू नये

आणि प्रेक्षकांवर पडणारा मानसिक ताण दूर व्हावा, यासाठी "डॉक्टर–वैद्य–कम्पौंडर" नाना यांचा उपयोग करून घेण्यात आला आहे.

कथा भली मोठी असूनही कथेवर शेवटपर्यंत पकड ठेवण्याचा प्रयत्न श्री. कुलकर्णी यांनी केला आहे. तथापि अजून काटछाट करून (विशेषतः पहिल्या अंकामध्ये) कथा अधिक टोकदार बनवल्यास प्रयोग यशस्वी होऊ शकेल.

कुलकर्णी यांच्या कथेमध्ये तसे नावीन्य नाही (कन्यादान, दिल एक मंदिर सुवासिनी आदी चित्रपटांची कळत–नकळत आठवण होत असते). तरी हे कथा-हीन नृत्य-झंकाराच्या निनादाने केवळ पोटार्थी धंदा करणाऱ्या मंडळींपेक्षा उदात्त मानवी मूल्यांचे उत्तम दर्शन घडवणारे दत्ता केशव यांचे हे नाटक निश्चितपणे समाधानकारक वाटते.

कथा जशी भावनाप्रधान, तसेच त्यांचे संवादही भावनेला हात घालणारे आहेत, नाटकातील विनोदी प्रसंग नाटककाराने चांगल्या प्रकारे खुलवले आहेत. विशेषतः. नानांच्या संवादांतून व्यावसायिक शब्दांचा मार्मिकपणे वापर केला आहे.

कथाबांधणीतील बारीकसारीक दोष संवादामुळे संतुष्ट झालेल्या प्रेक्षकांच्या ध्यानी येत नाहीत / आणि कित्येक जागी प्रेक्षक दिलखुलासपणे संवादाला टाळी देतो.

उत्तम निर्मिती, उत्कृष्ट कलावंत, या मद्रासनिर्मित हिंदी चित्रपटांच्या महत्त्वपूर्ण बाबी. कथेच्या बाबतीत या चित्रपटांचा मागोवा घेणारे हे नाटक या दोन्ही बाबीं-मध्ये पुष्कळ समाधान देऊन जाते.

रमेश देव, सीमा, ही सिनेमावाली मंडळी असूनही नाटक तालमी घेऊन बस-वल्याचे जाणवते. माधवीची अवघड भूमिका सीमाबाई मोठ्या नीटसपणे निभाव-तात. रमेश देव, (श्रीधर) पहिल्या अंकामध्ये एकदम मुक्कड वाटल्याने निराशा झाली. पण दुसऱ्या अंकानंतर मात्र त्यांनी पुष्कळच समाधान दिले आहे. कृष्णकांत दळवी डॉक्टर रामची भूमिका यशस्वीपणे सादर करतात. देव–दळवी जोडीमध्ये दळवी आघाडी मारतात.

उशिरा रंगभूमीवर येणारे बाबा वैशंपायन (नाना) सहजसुंदर अभिनयाचे प्रभावी दर्शन घडवतात. नाटकाची निर्मितिमूल्ये चांगली आहेत. धंद्याला आवश्यक असणाऱ्या सर्व गोष्टी साधना रंगभूमीने आपल्या या नाटकामध्ये एकत्रित केल्या आहेत. दैव अनुकूल असले, तर कंपनीला आणि श्री. कुलकर्णी यांना हे नाटक आर्थिक यशाकडे घेऊन जाईल.

–शरद गोखले

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

## १३ ते १९ एप्रिल राशि-भविष्य

**मेष :** रवि–मंगळासारख्या जहाल ग्रहांचे भ्रमण राशीमधून सुरू झाले की त्याचे पडसाद तुमच्या अंतर्मनावर उमटल्याशिवाय कसे राहतील ? तुमच्या सहनशीलतेची ही परीक्षाच आहे. या परीक्षेत आपण चांगल्या प्रकाराने उत्तीर्ण व्हाल याची मला खात्री आहे, पण सावध व जपून राहणे वाईट नाही.

मनात प्रक्षोमक विचारांना थारा देऊ नका. आणि कोणतीही गोष्ट थोरामोठ्यांच्या सल्ल्याशिवाय करू नका.

या कालात तुमचा प्रयत्नवाद उफाळून येईल. प्रभावी इच्छाशक्तीने अशक्य, असंभवनीय वाटणारी कामेही यशस्वी ठरतील.

या काली प्रकृतीला विशेष जपा. सामाजिक क्षेत्रात भाग घेण्याचे प्रकर्षाने टाळा. दि. १७ ते १९ एप्रिल या कालावर सारे लक्ष केंद्रित करा.

**वृषभ :** बारावा मंगळ म्हणजे वृषभ राशीच्या व्यक्तींवर काहीसा आघातच. सांपत्तिक ताण, चारित्र्यावर शितोडे, व्यावसायिक मतभेद आणि अंगीकृत कार्यात गतिहीनता इ. प्रकार निर्माण करण्यात या बाराव्या मंगळाचाच हात आहे. अशा वेळी तुमच्या हातून थोडाजरी अनावधानपणा घडला तरी हितशत्रू तुमच्या भोंगळपणाचा फायदा उचलल्याशिवाय राहणार नाहीत.

चौफेर दृष्टी ठेवून वागलात तरच तुमचा निभाव लागेल. स्थावराच्या कटकटी आणि वाहनात आकस्मिक बिघाड यांचीही त्यात आणखीन भर. तात्पर्य, हे दिवस संपूर्ण स्वास्थ्याचे व घवघवीत यशाचे नाहीत.

वरिष्ठांची नाराजी होईल, असे काही करू नका. आणि उधळेपणाला आळा घाला. दि. १८।१९ एप्रिलपासून सर्वत्र आशादायक वातावरण दिसू लागेल.

**मिथुन :** एकादशात सूर्य-मंगळ – अंतरिक्षातील अधिकाधिक सामर्थ्यशाली ग्रह एकत्र आले आहेत. असा मोका क्वचित्काली येतो आणि म्हणूनच तो चिरंतन कल्याणाच्या घटना घडवून आणतो.

जीवनाबद्दल कृतार्थता वाटण, सुख आणि प्राप्त परिस्थितीतून समाधान निर्माण करणे, मत्सर आणि अवास्तव महत्त्वाकांक्षा यांनी जीवन रखरखीत आणि असह्य

होऊ न देणे—या प्रवृत्ती या काली निर्माण होतील आणि त्याचाच तुम्हांला अधिकाधिक लाभ करून घेता येईल.

अधिकाधिक लाभ, व्यावसायिक सर्वोच्च प्रतिष्ठा आणि सांसारिक सुखासमाधानाची प्राप्ती हे सर्व काही याच काली घडावे.

अपेक्षासाफल्याचा काल हाच.

दि. १७ ते १९ एप्रिल या कालात आपले बरेचसे हेतू सफळ व्हावेत.

**कर्क** : दशमांत सूर्य-मंगळ आपल्या व्यावसायिक आशाआकांक्षा सफल करायला एवढा योग पुरेसा आहे. गेल्या पंधरवड्यापासूनच तुमची प्रगतीकडे वाटचाल सुरू आहे. या वेळी तर विक्रमी यश संपादू शकाल.

याच कालात राजकीय क्षेत्रातील फार मोठ्या जबाबदाऱ्या स्वीकारू शकाल. आणि अपेक्षेपेक्षाही चांगल्या रीतीने यशस्वी करून दाखवाल. अधिकाऱ्यांची कृपा, इष्टमित्रांची सहानुभूती, मित्रजनांच्या भेटीगाठी, अनपेक्षित लाभाच्या संधी इ. अनेक गोष्टी आगामी ८-१५ दिवसांत लाभाव्यात. १५ एप्रिलच्या सूर्य—गुरू त्रिकोणापासूनच कालचक्र आपणास पूर्णत्वाने अनूकूल दिसू लागेल.

दि. १५ ते १९ एप्रिल सर्व अपेक्षा सफल करणारा काल हाच.

**सिंह** : हा आठवडा सूर्य-गुरू त्रिकोणाचा म्हणून विख्यात आहे. सूर्य भाग्यात येताच जीवनात काही लोकोत्तर, भव्यदिव्य करून दाखवण्याच्या ऊर्मी उफाळून येतील. तुमच्यातील अनन्यसाधारण कर्तृत्वशक्तीचे जगाला दर्शन घडेल, सामाजिक क्षेत्रातील तुमचे महत्त्व निरपवाद सिद्ध होईल.

१५ एप्रिलपासून तुमच्या आशा आकार घेऊ लागतील, यांत्रिक, विद्युत् आण्विक क्षेत्रांत उत्क्रांति—पर्व सुरू होईल. व्यवसाय-धंद्यात – सामाजिक क्षेत्रात आवाज उठवाल आणि या वेळी तुम्ही कोठेही गेलात तरी तुमचा तिथे सत्कार घडू लागेल.

तुमच्या जीवनातील अत्युत्तम काल म्हणून याची नोंद केली जाईल.

दि. १५ ते १९ एप्रिल अत्युत्तम काल.

**कन्या** : आपल्या कन्या राशीबाबतीत फारसे काही न लिहावं, न बोलावं हेच बरं ! अजुन १॥ – २ महिने तरी याच अडीअडचणीतून आपणांस जावे लागणार आहे. अशा प्रसंगांना उरणारी माणसे तुम्ही नव्हेत हे मान्य करूनही हा सध्याचा काल कमालीची बेचैनी वाढविणारा आहे हे मला स्पष्टपणे सांगावे लागत आहे.

विरोधक दंड थोपटून आव्हान देतील, वरिष्ठ नाही नाही ते बोलून घेतील. अशा वेळी सरळ सरळ माघार घेणे याशिवाय अन्य पर्याय नाही. प्रकृती, मन:स्थिती बरीच बिघडेल एवढेच नव्हे तर या तणातणीचा तुमच्या भविष्य कालावरही अनिष्ट परिणाम घडेल.

दि. १८,१९ एप्रिलपासून या पेचातून कसातरी मार्ग निघेल.

तूळ : राशिव्यक्तींचे भवितव्य उज्ज्वल आहे. यांत शंकाच नाही. पण सध्याचा वर्तमानकाल फारसा स्वास्थ्याचा नाही. भविष्यकालीन उज्ज्वलतेसाठी वर्तमान-कालात थोडेसे कष्ट सहन करावे लागतातच.

रवि-मंगळ सप्तमस्थानी याच ग्रहस्थितीचा मधून मधून विरोध जाणवेल. पण १५ एप्रिलच्या सूर्य–गुरू त्रिकोणापासून आशादायक वातावरणही दिसू लागेल. कलाक्षेत्राव, चित्रपट-व्यवसायात साहित्य-संशोधन प्रांतातही प्रगतीच्या नव्या वाटा दृष्टिक्षेपात याव्यात. भवितव्यकालीन प्रगतीला विघ्ने येऊ नयेत म्हणून तरी सध्याचे संघर्षात्मक वातावरण निमूटपणे सहन करायची तयारी ठेवा.

दि. १५ ते १९ एप्रिल अपेक्षा काही प्रमाणात सफल व्हाव्यात.

**वृश्चिक :** सध्याचे दिवस अपयशाचे नाहीत, पण ताणाचे व भयंकर दगदगीचे मात्र आहेत. उत्साहान काही करायला जावे आणि अपेक्षेप्रमाणे ते यश घेऊन उठू नये, असे पदोपदी प्रत्ययास यायला लागेल.

योजलेल्या मोठ्या व्यवहारांना पैसा अपुरा पडू लागेल, भागीदारीचे व्यवहार बिघडण्याची लक्षणे दिसू लागतील. कुठेही गेलो तरी हमखास विजयी होऊन येईन या तुमच्या आत्मविश्वासाला तडा जाण्याची लक्षणे दिसू लागतील.

त्यातल्या त्यात वैद्यकीय, राजकीय क्षेत्रात थोडेफार अनुकूल दिवस जाणवायला लागतील. प्रयत्नांची शिकस्त केलीत तरच यश पदरी पडेल.

दि. १५ ते १७ एप्रिल अनुकूल वातावरण दिसू लागेल.

**धनु :** सूर्य-गुरू त्रिकोणात –हा अनन्यसाधारण योग या वेळी आपले चारित्र्य घडविणारा आहे. चौथ्या शनि-राहूवर हे ग्रह निश्चितच मात करतील.

या आठवड्यापासून आपली अंगीकृत कार्ये गती घेऊ लागतील. विरोधकांची कारस्थाने उधळली जातील, द्वेष करणारी माणसेही केव्हा केव्हा हार्दिक सहकार्य द्यायला उद्युक्त होतील.

**फोटोग्राफीमध्ये अग्रेसर ✦ ४० वर्षांची अविरत सेवा**

**एस्. एम्. साळवी फोटो स्टुडिओ**

वसंत टॉकीज, पुणे २.

व्यवसाय-धंद्याचे नवे स्वरूप याच काली प्रगटेल, अविकाराचे स्थान लाभण्याची लक्षणे स्पष्टपणे दिसू लागतील.

मनातील दौर्बल्य दूर होऊन ती जागा उत्साहाने भरून काढली जाईल. दूरचा प्रवास घडेल.

दि. १५, १७ व १९ एप्रिल अपेक्षित यश पदरी पडावे.

**मकर** : मंगळाच्या जोडीला सूर्यही चौथा. मोठ्या क्लेशदायक प्रसंगांमधून तुम्हांला जावे लागेलसे दिसते. अपयश, अपेक्षाभंग असे काही घडणार नाही पण नितान्त सावधगिरी सतत बाळगायला हवी. सांपत्तिक चणचण कमालीची जाणवेल. अंगीकृत व्यवसाय-धंद्यात अपेक्षित यश दिसेनासे होईल. स्थावराचा प्रश्न अधिक कटकटीचा जाणवू शकेल. एक ना दोन अनेक व्यथा-विवंचना या काली सहन करणे भाग पडेल. अशा काली फार मोठ्या जबाबदाऱ्या उचलू नका, आणि नोकरी-धंद्यात बदल घडवून आणण्याचे विचार डोक्यात आणू नका. हवामान अनुकूल नाही याची जाणीव ठेवून सतत दक्षता बाळगा.

दि. १५ ते १८ एप्रिल हे दिवस अनेक कामांत धवधवीत यशाचे जाणवतील.

**कुंभ** : पराक्रमात रवि–मंगळांची उपस्थिती, आता दबलेला आवाज उठू लागेल. माघार घेण्याची नामुष्की टळेल, पुढचे पाऊल अधिक जोमात पडेल.

नोकरी-धंद्यात स्थानांतर, बदल घडून येण्याची लक्षणे दृष्टिक्षेपात यायला लागतील. शनि-राहूंचा जाच आता फारसा सहन करावा लागणार नाही.

धार्मिक किंवा मांगलिक हेतूने प्रवास घडेल, व्यवसाय-धंद्यात नवे यशस्वी, प्रभावी तंत्र वापरले जाईल. तुमचा अनिष्ट काल आता जवळ जवळ ओसरलाच आहे. प्रयत्नांची शिकस्त केलीत तर हवं ते साध्य करून घ्याल.

अनेकांचे सहकार्य लाभेल. दैविक कृपेचाही हातोहात प्रत्यय यावा.

दि. १५, १७, १९ एप्रिल अनेक आशाआकांक्षा सफल व्हाव्यात.

**मीन** : सध्या तरी निदान मीन राशीची माणसे अगदी हातघाईवर आल्यासारखी दिसायला लागतील. त्याचबरोबर असाही प्रत्यय यायला लागेल की या झगड्यात आज ना उद्या विजय आपणासच मिळेल. १५ एप्रिलच्या सूर्य-गुरू त्रिकोणापासून मानसिक औदासीन्य मावळू लागेल, व्यावहारिक पेचप्रसंग सुटू लागतील, हुकलेल्या संधी पुन्हा भेटू शकतील. अपेक्षित यश आज जरी मिळाले नाही तरी नजीकच्या भवितव्यकालात ते निश्चित मिळेल असा आत्मविश्वास निर्माण व्हायला लागेल.

दंत–नेत्र विकाराचा त्रास जाणवेल. सांपत्तिक ताण असह्य वाटू लागेल.

दि. १५, १७, १९ एप्रिल काहीसा अनुकूल काल. O

[ कव्हर पान २ वरून ]
त्याचा अभिप्राय दिला आणि विनामूल्य सर्व प्रकारचे सहकार्य देण्याचे आश्वासन दिले.

**प्रश्न :** योजनेच्या खर्चाची तुम्ही काय तजवीज केली ?

**घुमरे :** खर्च करण्याचा प्रश्नच नव्हता. कारण आमच्या कोणाजवळही लहानशी चारी खणण्याइतका पैसा नव्हता. आमच्याजवळ होती श्रमशक्ती, शेकडो लोकांचे हात आणि खडकाप्रमाणे अभेद्य अशी जिद्द. या भांडवलावर ही योजना पूर्ण करण्याचे आम्ही निश्चित केले.

**प्रश्न :** लोक कसे तयार झाले ?

**घुमरे :** थोडी आत्मस्तुती होईल पण खरे ते सांगतो. मी वकील, सुशिक्षित म्हणून गावात माझ्याबद्दल आदर आहे. माझा शब्द अखेरचा मानण्याची गावकऱ्यांची तयारी आहे. त्यांच्या चांगल्यासाठी या परिस्थितीचा फायदा घेण्याचे मी ठरविले. एक दिवस गांवकऱ्याची सभा बोलवून मी योजना समजून सांगितली आणि ठरविक दिवसापासून पाळीपाळीने पन्नास माणसांनी खड्डा खणण्याचे काम सुरू करावयाचे असे त्यांना सांगितले.

**प्रश्न :** लोक कामावर आले का ?

**घुमरे :** कोणत्याही सरकारी कचेरीत कर्मचारी इतक्या वक्तशीरपणे येत नसतील इतक्या आपुलकीने ठरविलेले लोक कामावर आले. विशेष म्हणजे, या कामात आमचा भगिनीवर्ग मागे नव्हता.

**प्रश्न :** त्यांना मजुरी देण्यात येत होती काय ?

**घुमरे :** नया पैसासुद्धा नाही. घरचे काम म्हणूनच सर्वजण सतत सहा महिने हे काम करीत होते.

**प्रश्न :** एकूण काम किती झाले ?

**घुमरे :** सतत सहा महिने खोदाई करून २५० फूट लांब, ६० फूट रुंद आणि ५० फूट खोल असे काम पूर्ण झाले. पाणीही भरपूर लागले.

**प्रश्न :** प्रत्यक्षात त्यातून फायदा काय झाला ?

**घुमरे :** ते सांगण्यापूर्वी हे सांगितले पाहिजे की, काम पूर्ण झाल्यावर ना. शंकरराव चव्हाण यांनी कामाची पाहणी करून लिफ्ट इरिगेशन सोसायटी स्थापन करण्याचा सल्ला दिला. तशी सोसायटी झाल्यावर आम्हांला २ लाख १३ हजार रुपयाचे कर्ज मिळाले. त्यातून आम्ही चार एंजिन्स बसविली व परिणाम असा झाला की सर्व जिराईत जमीन बागाईत पिकाचे प्रमाण तिपटीने चौपटीने वाढले. जे गाव तीन हजार पोती आयात करीत असे ते आज दहा हजार पोती निर्यात करू शकते.

**प्रश्न :** योजना पूर्ण केल्यानंतर आपल्याला काही सांगावयाचे आहे काय !

**घुमरे :** पुढारी नेता या भूमिकेतून नव्हे पण एक कार्यकर्ता म्हणून आपले राज्य अन्नधान्य दृष्टया स्वयंपूर्ण तेव्हाच होईल जेव्हा प्रत्येक खेडे स्वयंपूर्ण होईल, ही स्वयंपूर्णता साकार करण्याचे सामर्थ्य सरकारमध्ये नाही. सरकारच्या पैशात नाही. ते फक्त गावकऱ्यांच्या परिश्रमात, निष्ठेत आणि निग्रहात आहे. जो कोणी आपल्याला कार्यकर्ता म्हणवीत असेल, त्याने प्रथमत: आपले खेडे, आपले गाव, आपले शहर (औद्योगिक वाढ करून) स्वयंपूर्ण केले पाहिजे. स्वयंपूर्णतेचे ध्येय गाठण्याचा हा एकच एकमेव मार्ग आहे, एवढेच मला नम्रतापूर्वक सांगावयाचे आहे. ○

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No M H-649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर.**